हिम वर्षावाचे सोबती
जरीवाला येथील
• जॅकेट • थर्मल • जर्किन
• स्वेटर्स • ग्लोज • सॉक्स
• कॅप्स् बरंच काही एकाच ठिकाणी
जरीवाला
• कापड बाजार, नं. 7666510765
• यशोदानगर, पाईपलाईन रोड, अ.नगर
• सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, पुणे. मो. 7775089505

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, सोमवार दि. ०९.०२.२०२६ | अंक नं. २५८ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

बंदूकींचे तसेच शस्त्र व दारुगोळा होलसेल व रिटेल विक्रेते
परवाना धारकांसाठी बंदूक तसेच विना परवाना धारकांसाठी एअर गण, एअर पिस्टोल CO2 खरेदी-विक्री व दुरुस्ती
SINGH GUN HOUSE बंदुक घर
सर्व प्रकारचे ओरिजनल (खऱ्या) रिव्हॉल्व्हर, पिस्टल १२ बोर, रायफल शस्त्र व दारुगोळा विक्रेते
महाराष्ट्रातील सर्वात मोठे बंदुकी मिळण्याचे बंदुक घर
पत्ता : पत्रकार चौक, अहिल्यानगर
Mo. 9011808063 / 9860992722
शाखा : मुंबई, पुणे, नाशिक, लातूर, सोलापूर, अहिल्यानगर, छ.संभाजीनगर, शिर्डी, परभणी, नवी मुंबई (वाशी), कल्याण, नागपूर, चाकण, शरदवाडी, श्रीरामपूर

स्वप्नवत ऑफर... स्वप्नवत सफर... १०१ भाग्यवंत जोडप्यांना चक्क FREE हनिमून टूर
1 डिसेंबर 2025 ते 31 मे 2026
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

फायदाच फायदा!
22 कॅरेट सोन्याचा सर्वात कमी भाव, सर्वात कमी मजुरी.
Conditions Apply*
2014 पासुन आपल्या सेवेत..सोनेरी नातं..
दागिन्यांची प्रतीग्रॅम मजुरी ₹ 888/-*
चंदुकाका ज्वेल्स
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02

## सीनानदी पात्रातील अनधिकृत ‘धार्मिकस्थळ’ हटविले

### महापालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाची कारवाई

नगर – शहराच्या नागापूर उपनगरात सीनानदीच्या पात्रात उभारण्यात आलेले अनधिकृत धार्मिक स्थळ (मस्जिद) महापालिकेच्या अतिक्रमणविरोधी पथकाने ९ फेब्रुवारी रोजी जेसीबीच्या सहाय्याने पाडून टाकले आहे. मोठ्या पोलिस बंदोबस्तात ही कारवाई करण्यात आली.

महापालिकेच्यावतीने गेल्या आठवडाभरापासून शहरासह उपनगरांत अतिक्रमण हटाव मोहीम सुरु करण्यात आलेली आहे. शहरातील आशा टॉकीज चौक ते माणिक चौक, त्यानंतर जुने बसस्थानक परिसर ते माळीवाडा वेस रस्त्यावरील अतिक्रमणे काढण्यात आली. उपनगरात बालिकाश्रम रस्त्यावरही असलेली अतिक्रमणे हटविण्यात आली आहेत. ९ फेब्रुवारी रोजी नागापूर उपनगर भागात ही मोहीम राबविण्यात आली. या परिसरात सीनानदी पात्रात अनधिकृत धार्मिक स्थळ (मस्जिद) उभारण्यात आले होते. पत्र्याचे शेड ठोकून उभारण्यात आलेल्या या धार्मिक स्थळावर महापालिकेच्या पथकाने कारवाई करत ते जेसीबीच्या सहाय्याने पाडण्यात आले आहे. यावेळी तेथे मोठी गर्दी झाली होती. कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून मोठा पोलिस बंदोबस्त यावेळी तैनात करण्यात आला होता.

महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांच्या आदेशानुसार अभियंता सुरेश इथापे, बाळासाहेब पवार, क्षेत्रीय अधिकारी देविदास बिज्जा, राहुल साबळे यांच्यासह पथकाने ही कारवाई केली.


नागापूर येथील सीनानदी पात्रातील अनधिकृत धार्मिकस्थळ जेसीबीच्या सहाय्याने हटविण्यात आले.

कॅमल सुपरफाईन शाबुदाणा
1 किलो | 500 ग्रॅम | 250 ग्रॅम पॅकिंगमध्ये उपलब्ध
कॅमल इन्स्टन्ट शाबुदाणा 1KG पॅकमध्ये उपलब्ध
सर्व किराणा दुकानात उपलब्ध
स्टॉकिस्ट
अशोक बन्सीलाल पारख
कॅमल हाऊस, आडते बाजार, अहिल्यानगर
(0241) 2343896/2341196

लई भारी ! १ नंबर
भारत देशकी सर्वतम श्रेष्ठ खुशबु
परिमल भारतवासि अगरबत्ती
२०,३२,१००,२०० ग्रॅम मध्ये उपलब्ध
अगरबत्ती होलसेल व रिटेल साठी
केवल अगरबत्ती
हॉटेल ससरंग समोर, आडते बाजार, अहमदनगर. फोन : २३५८०५०

पाहिजेत
सोनचाफा ज्वेलरी शोरुमकरिता सेल्सगर्ल्स पाहिजे.
आकर्षक पगार
भेटा : कोहिनूरसमोर, कापडबाजार, अहिल्यानगर
9356352421

रेप्युटेड बँक लोन ऑफर ५१+
25 करोड पर्यंत लोन
जुने लोन कमी व्याजदरात ट्रान्सफर करा
8.50% व्याजदर
प्रॉपर्टीवर लोन मिळेल
बियरबार / परमिट रूम / इंडस्ट्रीयल / हॉटेल / हॉस्पिटल / कमर्शियल / रेसीडेंशियल / शाळा / कॉलेज / इंडस्ट्रियल प्रॉपर्टी ओपन प्लॉट वर सुद्धा लोन
Term Loan 15 year-CC/OD
सन फायनान्स अ.नगर
8888826151

प्रथम पुण्यस्मरण
स्व. करण किशोर महाले
जन्म. दि. १६/०९/२००० स्वर्गवास दि. ९/२/२०२५
सर्व म्हणतात की, आयुष्यातून एकजण गेल्याने आपले आयुष्य संपत नाही किंवा थांबत नाही..
पण हे कोणालाच कसे कळत नाही की लाखो लोक भेटले तरी त्या एकाची कमी पुर्ण होत नाही..!
तुझी आठवण आल्याशिवाय एकही दिवस जात नाही.
तुझ्या प्रेमळ स्मृतिस भावपुर्ण श्रद्धांजली
शोकाकुल
सदाशिव भिमाशंकर महाले (आजोबा)
किशोर सदाशिव महाले (वडिल)
सौ. जया किशोर महाले (आई)
सौ. प्रियंका अमित कुलथे (बहिण)
समस्त महाले परिवार अहिल्यानगर

नामांकित कंपन्यांचे आकर्षक वॉटर हीटर!
आजच भेट द्या!
Satbhai Mala, Shop No 8, Delhi Gate Rd, Near Gajanan Hospital, Ahilyanagar
8975979999 / 9822542011
ABHAY SALES

॥ श्री गणेशाय नमः ॥
RAINBOW MASALA
साध्या मसाल्याशी तडजोड का करावी?
तुम्ही विश्वास ठेवलेली चव आता अधिक दमदार
प्रत्येक स्वयंपाकघरासाठी उच्च दर्जाचे मसाले
रेनबो मसाले - अहिल्यानगर जिल्ह्याचे एकमेव अधिकृत वितरक
वर्षालक्ष्मी मार्केटिंग
फॉर्च्युन फूड्स शॉप नं.३, कावरे हाईट्स, जुनी वसंत टॉकीज रोड, चंदूकाका सराफ जवळ, अहिल्यानगर
पराग भरत जाखोटिया 9422228543
अनिरुद्ध भरत जाखोटिया 9850111119
तालुकानिहाय वितरक नेमणे आहेत

क्वॉलिटीत भारी.. किंमतीत कमी
लग्न समारंभ, सनासुदीसाठी मुलांचे लिनन फॅब्रिकमध्ये भारी क्वॉलिटीचे पार्टी वेअर ड्रेस
१ ते ८ वर्षां पर्यंतच्या मुलांचे बाबासुट — रु. १५०० किंमतीचे फक्त ₹500/-
१ ते १६ वर्षां पर्यंतच्या मुलांचे कुर्ता-पायजमा — रु. २००० किंमतीचे फक्त ₹500/-
अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल
वेळ - दुपारी १२ ते सायंकाळी ७ पर्यंत
पुरुषांसाठी सर्व काही मयुरी लेडिज मॉलच्या वर
शुभ मॉल
मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कुल जवळ, आगरकर मळा, अ.नगर 9028201188

क्वॉलिटीत भारी.. किंमतीत कमी
मुलींचे १ ते १६ वर्षापर्यंत पार्टी वेअर भारी क्वॉलिटीचे ड्रेस
रु. 3000 किंमतीचे फक्त ₹ 600/-
वेळ : दु.१२ ते सायं.७ पर्यंत.. मर्यादित स्टॉक
अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल
मयुरी लेडिज मॉल
मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कुल जवळ, आगरकर मळा, अ.नगर 9028201188

SONI TILES AND MARBLE INDUSTRIES Since 1965
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अ‍ॅण्ड मार्बल इंडस्ट्रिज
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720 Mob. 9372497999

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# सर्जेपुरा पोस्ट ऑफिस कोणत्याही परिस्थितीत बंद करू नये, हालचालींना स्थानिक लोकप्रतिनिधींसह नागरिकांचा विरोध

## लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा

नगर – सर्जेपुरा, अहिल्यानगर येथील पोस्ट ऑफिस बंद करण्याबाबत सुरू असलेल्या हालचालींमुळे परिसरातील नागरिकांमध्ये तीव्र अस्वस्थता निर्माण झाली असून, या निर्णयाला स्थानिक लोकप्रतिनिधींसह नागरिकांनी विरोध दर्शविला आहे. यासंदर्भात उपमहापौर, नगरसेविका व नगरसेवकांनी वरिष्ठ डाक अधीक्षक, हेड पोस्ट ऑफिस, अहिल्यानगर यांना निवेदन देत सर्जेपुरा पोस्ट ऑफिस कोणत्याही परिस्थितीत बंद करू नये, अशी मागणी केली आहे.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे सर्जेपुरा पोस्ट ऑफिस हे सर्जेपुरा, तेलीखुंट, डाळमंडई भागातील रामवाडी, बागडपट्टी, दादा गॅरेज, कोठला बस स्थानक, दिल्ली गेट परिसर, बालिकाश्रम रोड आदी दाट लोकवस्तीच्या परिसरासाठी अत्यंत महत्त्वाचे केंद्र आहे. या भागातील खातेदारांची संख्या मोठी असून, शालेय विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, तसेच सुमारे २० अल्पबचत एजंट व त्यांच्याशी संबंधित शेकडो खातेदारांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होणार आहे, असा मुद्दा लोकप्रतिनिधींनी उपस्थित केला आहे.

तसेच या परिसरात पंजाब बँक, एस.टी. विभागीय कार्यशाळा, पोलीस मुख्यालय, ओरिएंटल बँक, लातूर बँक, बँक ऑफ इंडिया, इंडसइंड बँक यांसारख्या महत्त्वाच्या शासकीय व खासगी संस्था कार्यरत आहेत. या सर्व संस्थांसाठी सर्जेपुरा पोस्ट ऑफिस हे सोयीचे आणि जवळचे सेवा केंद्र असून, ते बंद झाल्यास व्यवहारांवर प्रतिकूल परिणाम होणार आहे. विशेषतः महिला अल्पबचत एजंट यांच्या रोजगारावर आणि कामकाजावर याचा गंभीर परिणाम होईल, अशी स्पष्ट भूमिका निवेदनात मांडण्यात आली आहे.

लोकप्रतिनिधींनी स्पष्ट इशारा देत सांगितले आहे की, जर सर्जेपुरा पोस्ट ऑफिस बंद करण्याचा निर्णय मागे घेण्यात आला नाही तर परिसरातील निवडून दिलेले प्रतिनिधी व नागरिक लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडतील. हा निर्णय सामाजिक, आर्थिक आणि प्रशासकीय दृष्टिकोनातून अयोग्य असून, नागरिकांच्या मूलभूत सोयींवर गदा आणणारा असल्याचेही त्यांनी नमूद केले आहे.

या निवेदनावर उपमहापौर धनंजय कृष्णा जाधव, नगरसेविका सौ. शीतल अजय ढोणे, सौ. मयुरी प्रशांत जाधव आणि सागर राजू मुर्तडकर यांच्या स्वाक्षऱ्या असून, सर्जेपुरा पोस्ट ऑफिस बंद न करण्याची एकमुखी मागणी करण्यात आली आहे. आता डाक विभाग याबाबत कोणता निर्णय घेतो, याकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.

# भरधाव वेगातील कारची रिक्षा व दुचाकींना धडक

## घराची भिंत पडून नुकसान; बालिकाश्रम रस्त्यावरील घटना

नगर – शहरातील बालिकाश्रम शाळेजवळील ढोर गल्ली परिसरात भरधाव वेगात आलेल्या कारने रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या रिक्षा व दुचाकींना जोराची धडक दिल्याची घटना ८ फेब्रुवारी रोजी पहाटे घडली. या अपघातात रिक्षा, दुचाकी तसेच घराची भिंत पडून नुकसान झाले असून सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.

या प्रकरणी रिक्षाचालक गणेश जगन्नाथ कोकणे (रा. बालिकाश्रम परिसर) यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात दिलेल्या खबरीवरून अपघाताची नोंद करण्यात आली आहे. कोकणे यांनी त्यांची रिक्षा व मोपेड दुचाकी ही वाहने नेहमीप्रमाणे बालिकाश्रम शाळेजवळ, ढोर गल्ली येथे घरासमोर उभी केली होती. परिसरातील इतर नागरिकांचीही रिक्षा व दुचाकी याच ठिकाणी उभ्या असतात. ८ फेब्रुवारी रोजी पहाटे अंदाजे २.१५ ते २.३० च्या दरम्यान जोराचा आवाज झाला.

आवाजाने जाग आल्यावर कोकणे यांनी पाहिले असता घराचा लाकडी दरवाजा तुटलेला व घराची भिंत कोसळलेली दिसून आली. बाहेर पाहणी केली असता कार ही बालिकाश्रम रस्त्याकडून दिल्लीगेटकडे जाणार्या रस्त्यावरून भरधाव वेगात येऊन घरासमोर उभ्या असलेल्या रिक्षाला जोरात धडकली होती. या धडकेत घराची भिंत पडून रिक्षा व मोपेड एकमेकांवर आदळून त्यांचे मोठे नुकसान झाले.

याशिवाय शेजारी उभ्या असलेल्या तीन रिक्षांनाही या अपघातात धडक बसून नुकसान झाले आहे. कार चालक शुभम नरेंद्र पेवाल (वय १९, रा. मुन्सीपल कॉलनी, सिध्दार्थनगर) याच्या निष्काळजी व वेगवान वाहन चालविल्यामुळे हा अपघात झाल्याचे खबरमध्ये नमूद करण्यात आले आहे.

## महेश लुणिया यांचे निधन



नगर – वसंत टॉकीज चंदूकाका सराफ मागे माळीवाडा येथील रहिवासी व कापड बाजार येथील शामसुंदर अॅण्ड कंपनीचे संचालक महेश प्रेमराज लुणिया (वय ७१) यांचे डीएसपी चौकात ८ फेब्रुवारी रोजी अपघाती निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे २ मुले, पत्नी, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

## कैलास निकम यांचे अल्प आजाराने निधन



नगर – दातरंगे मळा येथील रहिवासी कैलास संजय निकम (वय ३६) यांचे ८ फेब्रुवारी रोजी अल्प आजाराने दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर ८ फेब्रुवारी रोजी नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे आई असा परिवार आहे.

## निर्मलाबाई कुरुमकर यांचे वृद्धापकाळाने निधन



श्रीगोंदा – मुंढेकरवाडी (ता.श्रीगोंदा) येथील रहिवासी श्रीमती निर्मलाबाई (काकी) गोविंद कुरुमकर (वय ८७) यांचे ९ फेब्रुवारी रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर मुंढेकरवाडी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे १ मुलगा, २ मुली, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. विठ्ठल कुरुमकर, कमल कदम, मंगल बेद्रे यांच्या त्या मातोश्री होत.

## पुष्पाबाई मेहेर यांचे अल्प आजाराने निधन



नगर – आष्टी येथील रहिवासी श्रीमती पुष्पाबाई पोपटलाल मेहेर (वय ८०) यांचे ८ फेब्रुवारी रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर आष्टी अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्यामागे २ मुले, १ मुलगी, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे. आष्टी येथील नितीन ट्रेडर्सचे संचालक दिलीप, नितीन मेहेर यांच्या त्या मातोश्री तर दर्शन मेहेर यांच्या आजी होत.

## सय्यद समीर नूर मोहम्मद यांचे निधन



भिंगार – येथील मोमीन गल्ली मध्ये राहणारे सय्यद समीर नूर मोहम्मद उर्फ (लाला फुलवाले) यांचे ६ फेब्रुवारी रोजी अल्पशा आजाराने निधन झाले.

त्यांच्या मागे दोन मुली, एक मुलगा, पत्नी, वडील तसेच सादिक अत्तर यांचे ते चुलते होत.

## रविंद्र भंसाली यांचे हृदयविकाराने निधन



जळगाव – जळगाव येथील लॉरेन्स स्कूल जवळील ईश्वर कॉलनीतील रहिवासी रविंद्र ताराचंद भंसाली (वय ५५) यांचे ८ फेब्रुवारी रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर निरी नाका वैकुंठधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे १ भाऊ, भावजय, पत्नी, १ मुलगा, २ मुली, जावई असा परिवार आहे. प्रविण भंसाली यांचे ते मोठे बंधू तर भावेश, पायल, दिक्षा यांचे वडील होत.

# शासकीय रुग्णालयांतील शुल्क आकारणीचा शासन निर्णय तात्काळ रद्द करण्यात यावा

## मुख्यमंत्र्यांकडे किरण काळेंची मागणी



नगर – आता शासकीय रुग्णालयांमध्ये उपचारांसाठी शुल्क आकारणी करण्याचा निर्णय राज्य सरकारच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने घेण्यात आला आहे. याबाबतची सुधारित व अद्यावत नागरिकांची सनद नुकतीच जारी करण्यात आली आहे. यापूर्वी ही सुविधा पूर्णतः मोफत होती. सरकारच्या या शासन निर्णयावर अहिल्यानगर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्ष्याच्या वतीने हरकत घेण्यात आली आहे. सर्वसामान्य नागरिक, गोरगरीब जनतेवर अन्याय करणारा हा शासन निर्णय तात्काळ रद्द करण्यात यावा, अशी मागणी लेखी निवेदनाद्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे ठाकरे शिवसेनेचे महानगर प्रमुख किरण काळे यांनी केली आहे.

किरण काळे यांनी निवेदनात म्हटले आहे, या निर्णयामुळे सर्वसामान्य माणसाचं जगणं मुश्किल होणार आहे. यापूर्वी राज्यातील जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय तसेच महानगरपालिका रुग्णालयांमध्ये नागरिकांना मोफत आरोग्य सेवा मिळत होती. याचा राज्यातील कोट्यावधी नागरिक लाभ घेत होते. मात्र आता आरोग्य विभागाने घेतलेला निर्णय हा सर्वसामान्य माणसाला, गोरगरीब जनतेला आरोग्या सारख्या मूलभूत सुविधे पासून वंचित ठेवणारा आहे. देशातील अनेक राज्यांमध्ये आरोग्याचा पूर्ण खर्च हा सरकार उचलते. मात्र महाराष्ट्र याला दुर्दैवाने अपवाद ठरला आहे. हे शासन गोरगरिबांसाठी आहे की धन दांडग्यांसाठी, मूठभर उद्योगपतींसाठी आहे, असा सवाल काळे यांनी उपस्थित केला आहे.

राज्यातील दारिद्र्य रेषेखालील नागरिकांची संख्या आजही मोठी आहे. गोरगरीब, कष्टकरी, हातावर पोट भरणारे तसेच ग्रामीण भागातील मोठा समुदाय हा आर्थिक दुर्बलतेमुळे खाजगी रुग्णालयां मध्ये उपचार घेऊ शकत नाही. म्हणून तो शासकीय आरोग्य सुविधांवर अवलंबून आहे. पैशांअभावी उपचार न मिळाल्यास राज्यातील कोट्यावधी लोकांचे जगणे असह्य होऊ शकते. त्यामुळे सर्वसामान्य नागरिक, गोरगरिबांची आरोग्य विषयक होणारी गैरसोय लक्षात घेता तात्काळ सदर अन्यायकारक शासन निर्णय राज्य सरकारने तात्काळ मागे घ्यावा, अशी मागणी ठाकरे शिवसेनेच्या वतीने निवेदनाद्वारे किरण काळे यांनी केली आहे. या निवेदनाची प्रत सार्वजनिक आरोग्य विभागाचे मंत्री प्रकाश आबिटकर यांना पाठविण्यात आली आहे.

### असे आहेत दर

केस पेपर – ५ रुपये
रुग्णवाहिका प्रति किलोमीटर – ५ रुपये
सोनोग्राफी – ५० रुपये
दात काढणे – १५ रुपये (एक दातासाठी)
इसीजी – २० रुपये
आयसीयु – १०० रुपये (प्रतिदिन शुल्क)
फिटनेस प्रमाणपत्र – ५० रुपये
रक्त चाचणी – १५ रुपये
सांधा प्रत्यारोपण – ४०,००० रुपये
नर्सिंग चार्जेस – ६० रुपये (प्रति दिन)
दुसरे बाळंतपण – ५० रुपये
एमआरआय – १६०० रुपये
एक्स–रे – ३० रुपये
सिटीस्कॅन – ४०० रुपये

अशाप्रकारे प्रत्येक उपचार, तपासणीसाठी आता शुल्क आकारणी केली जाणार आहे.

# मुद्देमाल कक्षातून ९ कोटींचे अंमली पदार्थ चोरी प्रकरणी पोलिस कर्मचारी शामसुंदर गुजर याच्यावर गुन्हा दाखल

नगर – केंद्रीय मुद्देमाल कक्षात साठवून ठेवलेल्या अंमली पदार्थांच्या साठ्यातून तब्बल ९ कोटी रुपयांहून अधिक किमतीचा 'अल्प्रझोलम' हा अंमली पदार्थ चोरून त्याऐवजी मैद्याची भेसळ केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेचा पोलिस हवालदार शामसुंदर विश्वनाथ गुजर यांच्यावर तोफखाना पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांनी फिर्याद दिली. त्यानुसार, गुजर यांची नियुक्ती एनडीपीएस. कायद्यांतर्गत जप्त केलेल्या मुद्देमालाच्या कामकाजासाठी केली होती.श्रीरामपूर शहर पोलिस ठाण्यातीलएका गुन्ह्यातील १०.९७५ किलोवजनाचा पांढऱ्या रंगाचे स्फटिकअसलेला 'अल्प्रझोलम' हा अमलीपदार्थ मुद्देमाल कक्षात जमा होता.गुजर याने या मूळ मालाचा अपहारकरून, स्वतःच्या आर्थिकफायद्यासाठी तो विकला आणिपुराव्यामध्ये फेरफार करण्यासाठी त्यापोत्यात मैद्याचे पीठ भरले.

पुणे ग्रामीण पोलिसांनी गुजर यालाएका गुन्ह्यात अटक केल्यानंतर हासर्व काळाबाजार समोर आला.त्यामुळे पोलिस अधीक्षकांनीनेमलेल्या तपास समितीने यासाठ्याची पडताळणी केली असता, तब्बल ९ कोटी ९ लाख ७५ हजाररुपयांच्या मुद्देमालाचा अपहारझाल्याचा अहवाल दिला. या गंभीरकृत्यानुसार गुजर याच्यावरफसवणूक व विश्वासाघाताचा गुन्हानोंदवण्यात आला आहे.

### पोलिस खात्यातून केले बडतर्फ

पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी अंमली पदार्थ तस्करीमध्ये प्रत्यक्ष सहभाग आणि मुद्देमालाच्या अपहाराचा गंभीर ठपका ठेवत हवालदार शामसुंदर गुजर याला भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३११ (२) (ब) मधील तरतुदीनुसार शासन सेवेतून तातडीने बडतर्फ केले आहे.

# 'हिंद-दी-चादर' कार्यक्रमाची विविध उपक्रमांतून अहिल्यानगर जिल्हाभर व्यापक जनजागृती करा

## जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांचे निर्देश

नगर–'हिंद–दी–चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागमाचा कार्यक्रम २८ फेब्रुवारी व १ मार्च रोजी नवी मुंबईतील खारघर येथे आयोजित करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाची जिल्हाभरात विविध उपक्रमांच्या माध्यमातून सर्वदूर जनजागृती करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले.



जिल्हाधिकारी कार्यालयात 'हिंद–दी–चादर' कार्यक्रमाच्या पूर्वतयारीबाबत आयोजित आढावा बैठकीत बोलताना डॉ. पंकज आशिया.

जिल्हाधिकारी कार्यालयात 'हिंद–दी–चादर' कार्यक्रमाच्या पूर्वतयारीबाबत आयोजित आढावा बैठकीत डॉ. आशिया बोलत होते. बैठकीस अपर जिल्हाधिकारी शैलेश हिंगे, निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते, उपजिल्हाधिकारी भारती गायसमुद्रे, जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी दादाभाऊ गुंजाळ, जिल्हा नियोजन अधिकारी दीपक दातीर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बापूसाहेब नागरगोजे, सहायक कामगार आयुक्त रेवणनाथ भिसले, पोलीस निरीक्षक धनंजय जाधव आदींसह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले की, श्री गुरु तेग बहादूर यांच्या शौर्य, त्याग व बलिदानाची माहिती समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचण्यासाठी जिल्ह्यातील शाळा, महाविद्यालये, निवासी शाळा व शिक्षण संस्थांमध्ये प्रभातफेरी आयोजित करावी. तसेच त्यांच्या शहीदी स्मृतीनिमित्त तयार करण्यात आलेले व्हिडिओ व जिंगल्स शाळा व महाविद्यालयांमधून प्रसारित करावेत. विद्यार्थ्यांसाठी घोषवाक्य व निबंध स्पर्धांचे आयोजन करून उत्कृष्ट विद्यार्थ्यांना जिल्हास्तरावर प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात यावे, असेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या अनुषंगाने १० ते २७ फेब्रुवारी दरम्यान जिल्ह्यात आरोग्य पंधरवडा राबविण्याच्या सूचना देत जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले, औद्योगिक क्षेत्रातील कामगार, बांधकाम कामगार, ऊसतोड कामगार तसेच एस.टी. कर्मचारी, ट्रक चालक यांच्यासाठी विशेष आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित करावीत. यासोबतच रक्तदान शिबिरांचे आयोजन करून जनजागृती करावी. शिर्डी येथे आयोजित साई परिक्रमेच्या पार्श्वभूमीवर मोठ्या संख्येने भाविक उपस्थित राहणार असल्याने त्या ठिकाणीही आरोग्य शिबिरांचे आयोजन करून प्रचार–प्रसिद्धी करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

जिल्ह्यातील दिव्यांग व्यक्तींना आवश्यक साहित्य पुरवठ्यासाठी शिबिरे आयोजित करतानाच दिव्यांग तपासणी शिबिरे देखील घेण्यात यावीत. जनमानसात व्यापक जागृती निर्माण करण्यासाठी अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थ्यांचा सहभाग असलेली सायकल रॅली आयोजित करावी. श्री गुरु तेग बहादूर यांच्या कार्याची माहिती देणारी चित्रफीत जिल्ह्यातील प्रत्येक सिनेमागृहात प्रदर्शित करण्यात यावी, असेही निर्देश देण्यात आले.

कार्यक्रमाचा प्रचार व्यापक स्वरूपात होण्यासाठी शासकीय होर्डिंग, डिजिटल बोर्ड, बसस्थानके, रेल्वेस्थानके, आकाशवाणी व विविध समाजमाध्यमांद्वारे प्रचार–प्रसिद्धी करण्यात यावी, असेही जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी सांगितले.

यावेळी अपर जिल्हाधिकारी शैलेश हिंगे यांनी कार्यक्रमाच्या पूर्वतयारीची माहिती देत विविध विभागांना नेमून दिलेल्या जबाबदाऱ्या व नियोजनाचा आढावा मांडला. सर्वांनी समन्वयाने व एकसंघपणे काम करून हा कार्यक्रम यशस्वी करण्याचे आवाहन त्यांनी केले.

बैठकीस बलदेवसिंग वाही, सतिंदरसिंग नारंग, राजेंद्रसिंग चावला, अश्विंदरसिंग मल्होत्रा, हरप्रितसिंग नारंग, अमनदीपसिंग वाही, रविन्दरसिंग नारंग, अमरप्रित बलदेवसिंग वाही, ब्रह्मा लोंगियानी यांच्यासह संबंधित विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

# नगर–मनमाड मार्गावर ढंपरच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

नगर – नगर–मनमाड महामार्गावरील अपघातांचे सत्र सुरुच असून ८ फेब्रुवारी ला अस्तगाव (ता.राहाता) शिवारात मुरमाने भरलेला ढंपर आणि दुचाकी यांच्यात झालेल्या भीषण धडकेत एका तरुण दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला. या अपघातामुळे महामार्गावरील सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

मुरमाने भरलेला ढंपर (क्र. एमएच–१७ सीव्ही ३५०२) बाभळेश्वरकडून राहात्याच्या दिशेने जात होता. त्याच वेळी राहात्याकडून बाभळेश्वरकडे जाणारी दुचाकी (क्र. एम एच १७ सीएस ८०७९) अस्तगाव शिवारातील हॉटेल वसंत बहार समोर आली असता, दोन्ही वाहनांची समोरासमोर जोरदार धडक झाली. धडक इतकी भीषण होती की, दुचाकी चालक श्रीकृष्ण रामेश्वर तारडे याला गंभीर दुखापत झाली आणि त्याचा जागीच मृत्यू झाला.

अपघात घडताच घटनास्थळी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. मात्र, अपघाताचे भीषण स्वरूप पाहून ढंपर चालक आपले वाहन सोडून घटनास्थळावरून फरार झाला. राहाता पोलिसांनी तत्काळ ढंपर ताब्यात घेतला असून फरार चालकाचा शोध घेतला जात आहे.

# अवैध धंद्यांच्या विरोधात ग्रामस्थांचे 'आमरण उपोषण'; कारवाई झाली नाही तर आंदोलन अधिक तीव्र करणार



नगर तालुक्यातील रुईछत्तिसी परिसरातील अवैध व्यवसायाच्या विरोधात उपोषणास बसलेले ग्रामस्थ.

नगर – नगर तालुक्यातील रुईछत्तिसी परिसरात गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या अवैध वेश्याव्यवसाय, कला केंद्र (डान्स बार) व लेडीज वेटर सर्व्हिस त्वरित व कायमस्वरूपी बंद करण्यात याव्यात, या मागणीसाठी ९ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता ग्रामस्थांनी ग्रामपंचायत कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे.

या अवैध व्यवसायांबाबत पोलीस प्रशासनाला वेळोवेळी निवेदने, पत्रव्यवहार तसेच ग्रामसभेचा ठराव देऊनही कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. या संदर्भात २६ जानेवारी रोजी पोलीस प्रशासनास लेखी निवेदन देण्यात आले होते. मात्र त्यानंतर दहा दिवस उलटूनही कोणतीही कार्यवाही न झाल्यामुळे अखेर ग्रामस्थांनी आमरण उपोषणाचा मार्ग अवलंबला आहे.

रुईछत्तिसी हे गाव मोठ्या प्रमाणात बाजारपेठेचे असून येथे महाविद्यालये व शैक्षणिक संस्था आहेत. या अवैध व्यवसायांमुळे विद्यार्थ्यांवर तसेच गावातील तरुण–तरुणींच्या भविष्यावर गंभीर परिणाम होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या परिस्थितीमुळे अनेक पालक आपल्या मुला–मुलींना महाविद्यालयात पाठवण्यास घाबरत असून, गावातील सामाजिक वातावरण बिघडत असल्याची भावना व्यक्त करण्यात येत आहे.

जोपर्यंत हे अवैध व्यवसाय पूर्णपणे बंद होत नाहीत, तोपर्यंत आमरण उपोषण सुरूच राहील, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. तसेच, मागण्या मान्य न झाल्यास नगर–सोलापूर महामार्गावर तीव्र आंदोलन करण्याचा आणि वेळप्रसंगी आत्मदहनासारखा टोकाचा निर्णय घेण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला. या सर्व परिस्थितीस पोलीस प्रशासनच जबाबदार राहील, असेही ग्रामस्थांनी स्पष्ट केले.

दरम्यान, या उपोषणाची दखल घेत पोलीस उपअधीक्षकांनी उपोषणस्थळी भेट देऊन ग्रामस्थांशी चर्चा केली. यावेळी त्यांनी संबंधित अवैध व्यवसायांवर कारवाई करून ते सीलबंद केले जातील व यापुढे असे व्यवसाय चालू दिले जाणार नाहीत, असे आश्वासन दिले.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### सकाळी लसूण खाण्याचे लाभ

हिवाळ्यात त्याचे सेवन केल्याने शरीर उबदार राहते आणि रोगांशी लढण्याची क्षमता वाढते. आहारात लसूणसारखे अनेक निरोगी पदार्थ समाविष्ट करतात. लसणाबद्दल बोलायचे झाले तर, ते भारतीय पाककृतींमध्ये एक प्रमुख पदार्थ आहे, जे प्रत्येक घरात सहज उपलब्ध असते. लोक अन्नाची चव वाढवण्यासाठी याचा वापर करतात. लसूण हा एक सुपरफूड मानला जातो जो तुमची रोगप्रतिकारक शक्ती वाढवतो. त्यातील अँटीऑक्सिडंट्स आणि दाहक-विरोधी गुणधर्म हिवाळ्यात हंगामी संसर्गापासून तुमचे संरक्षण करण्यास मदत करू शकतात. ते सर्दी, विषाणू आणि हंगामी संसर्गाशी लढण्यास मदत करू शकते. लसूण खाल्ल्याने तुमचे चयापचय वाढते. ते शरीरात साठवलेली चरबी जाळण्याची प्रक्रिया वेगवान करते. ते तुम्हाला जास्त वेळ पोट भरल्यासारखे वाटते, ज्यामुळे तुम्ही जास्त खाण्यापासून वाचता. आजच्या धावपळीच्या जीवनात उच्च रक्तदाब ही एक सामान्य समस्या बनली आहे. लसूण खाणे फायदेशीर ठरू शकते. त्यात ॲलिसिन नावाचे एक विशेष संयुग असते. यामुळे रक्ताभिसरण सुधारते आणि हळूहळू तुमचा रक्तदाब नियंत्रित होतो. उच्च रक्तदाबाच्या रुग्णांसाठी हे एक नैसर्गिक उपाय म्हणून देखील काम करू शकते.

## पाककला

### उपवासाचे साबुदाणा धिरडे

**साहित्य :** एक कप साबुदाणा, एक उकडलेला बटाटा, दोन चमचे बारीक वाटलेले शेंगदाणे, बारीक चिरलेली हिरवी मिरची, एक चमचा लिंबाचा रस, बारीक चिरलेली कोथिंबीर, तूप, उपवासाचे मीठ, एक चमचा जिरे, पाणी

**कृती :** सर्वात आधी एक कप साबुदाणा सुमारे ४-५ तास पाण्यात भिजवा. मऊ भिजवलेला साबुदाणा हलक्या हाताने मॅश करा. आता उकडलेले बटाटे चांगले मॅश करा. एका भांड्यात मॅश केलेला साबुदाणा, मॅश केलेले बटाटे, जिरे, रॉक मीठ, शेंगदाणे, लिंबाचा रस, हिरव्या मिरच्या आणि कोथिंबीर घाला. आता हे सर्व साहित्य नीट मिसळा. आवश्यकतेनुसार मिश्रणात पाणी घाला. लक्षात ठेवा की धिरड्यासाठी बनवलेले पीठ जास्त जाड किंवा पातळ नसावे. आता एक पॅन गरम करा आणि त्यावर तूप पसरवा. बनवलेले पीठ तव्यावर ओता आणि ते समान रीतीने पसरवा. साबुदाणा धिरडे दोन्ही बाजूंनी सोनेरी होईपर्यंत बेक करा. तयार साबुदाणा धिरडे उपवासाच्या चटणीसोबत नक्कीच सर्व्ह करा.

## वास्तू

### वास्तूदोष करा दूर

* घरातील सर्व प्रकाराचे वास्तू दोष दूर करण्यासाठी मुख्य प्रवेशदाराच्या एका बाजूला केळीचं झाड आणि दूसर्याबाजूला कुंड्यात तुळस लावावी.

* स्वयंपाकघरासाठी दक्षिण-पूर्व हे सर्वोत्तम दिशा आहे. आणि उत्तर-पश्चिम दिशा यासाठी दुसरा पर्याय आहे. जर स्वयंपाकघर चुकीच्या जागेवर बांधलेलं असेल तर अग्निकोणात एक बल्ब प्रज्वलीत करावे.

* बेडरूममध्ये बीम असल्यास त्याखाली आपला बेड लावू नये. बीमच्या खाली जेवणाचे टेबल ठेवणेदेखील योग्य नाही.

## सौंदर्य

कीवीचे सेवन केल्यानं दात बळकट आणि चकचकीत बनविले जाऊ शकतात. किवी मध्ये व्हिटॅमिन सी, पोटॅशियम आणि फॉलिक ॲसिड आढळतात जे दातांसाठी चांगले असू शकतात.

## सल्ला

कॉफीचा सुगंध अनेकांना आवडतो आणि तो दुर्गंधी शोषून घेण्यासही मदत करतो. यासाठी एका वाटीत थोडे कॉफी बीन्स किंवा कॉफी पावडर घ्या आणि त्यात एक छोटी मेणबत्ती ठेवा. मेणबत्तीच्या उष्णतेने कॉफीचा सुगंध घरभर दरवळेल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

मंगळवार, दि. १० फेब्रुवारी २०२६

**---, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, माघ कृष्णपक्ष, विशाखा ०७|५५, सूर्योदय ०६ वा. ४२ मि. सूर्यास्त ०५ वा. ३४ मि.**

## राशिभविष्य

**मेष** : काही प्रेमपूर्ण अनुभव आज येऊ शकतात. हा वेळ आपल्या एखाद्या आवडीच्या व्यक्तीबरोबर घालवू शकता. मागील उधारी उसनवारी वसुल होईल.

**वृषभ** : आपल्या सहकाऱ्यांबरोबर झालेल्या मतभेदांचे निराकरण करण्याचा प्रयत्न करा. धावपळ जास्त होईल. देवाण-घेवाण टाळा.

**मिथुन** : आपल्या जुन्या लोकांना किंवा आधार देणाऱ्या मित्रांना जोडणे या वेळी आपल्यासाठी फलदायी ठरेल.

**कर्क** : इतर लोकांना आपल्या स्वतःची गरज व इच्छा सांगण्यासाठी ही उत्तम वेळ साधाल.

**सिंह** : आपल्या संपर्कात येणाऱ्या लोकांच्या वर्तनामुळे आपणास संताप येण्याची शक्यता आहे.

**कन्या** : योग्य उद्योगात गुंतवणूक केल्यास शेवटी आर्थिक नफा मिळेल. काही नवीन संधी मिळतील.

**तूळ** : आपण आपल्या महत्वाकांक्षा पूर्ण करू शकाल. कुटुंबाबरोबर आज घालवलेले आनंददायी क्षण आयुष्यभर स्मरणात रहातील.

**वृश्चिक** : आपणास आज संभाषणात काळजी घेण्याची गरज आहे. वेळ अनुकूल आहे.

**धनु** : व्यापार-व्यवसायासाठी छान दिवस. आपली इच्छा असेल तर दिवास्वप्नही खरी ठरू शकतात.

**मकर** : मानसिक सुख-शांतीचे वातावरण राहील. नोकरदार व्यक्तींना कामात अनुकूल वातावरण मिळेल.


**कुंभ** : पत्नीशी बोलल्यानंतर मूड छान होईल. कौटुंबिक प्रश्नांची उत्तरे मिळतील. मागील उधारी वसुल होईल.

**मीन** : आपल्या मित्रांना रात्रीचे जेवण आणि नृत्यासाठी बाहेर घेऊन जाण्यापूर्वी विचार करा.

## शब्दगंध क्र. ७३६३ सौ.शैलजा कुलकर्णी



शब्दगंध क्र. ७३६२ चे उत्तर



**आडवे शब्द :-** १) एक फळ ४) अनेक पाय असलेला एक कीटक ६) आकाशात विहार करणारा जीव ८) माज; नशा; ९) तप्त; रसरशीत कैफ ११) अंतरिक्ष; अंतराळ १४) पाणवट; चिखल १५) फिरस्ता; गोसावी १९) मंद; सावकाश; धिमा २०) पुत्र किंवा कन्या २१) उदर २२) चांदणी; नक्षत्र २३) विभागणी; वितरण २५) जुने फाटके वस्त्र; चिंधी २६) सावली; छाया

**उभे शब्द :-** १) मोगलांचे राज्य; बेबंदशाही २) साथ; सोबत ३) एक तंतुवाद्य ४) गायीचे दूध ५) साह्य; सहकार्य ७) हलणारे; विनाशी ८) मुस्लिमांचे प्रार्थनास्थळ १०) भूषण; चिन्ह १२) भीतीमुळे सुटणारा कंप १३) एक प्रकारची दारू १६) श्रीमंत; धनवान १७) बळकट; कणखर १८) प्रयत्न; प्रयास १९) रागाचा अतिरेक २४) एका हाताची ओंजळ

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार** : महानता कधीही न पडण्यात नाही, तर प्रत्येक वेळी पडल्यावर उठण्यात आहे.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### काय सांगता?...ओठांवरुन कळते हृदयाची स्थिती?

तुमच्या ओठांच्या रंगात थोडासा बदल तुमच्या हृदयाच्या आरोग्याबद्दलचे गुपित उलगडू शकतो आणि तुम्ही लवकरच मरणार आहात की नाही. हृदय हे आपल्या शरीरातील सर्वात नाजूक किंवा अगदी सहनशील अवयव मानले जाते. यात बरेचसे तथ्य आहे. हृदयरोग इतके व्यापक झाले आहेत की ते रोखणे ही आता आपली सर्वात मोठी जबाबदारी आहे. तुम्हाला माहित आहे का की तुमच्या सर्वात सुंदर शरीराच्या भागाचा - तुमच्या ओठांचा - रंग तुम्हाला हृदयरोगाचा धोका आणि तुम्ही लवकरच मरणार आहात की नाही हे सांगू शकतो?

तज्ञांचे म्हणणे आहे की हृदयरोगाची लक्षणे केवळ छातीत दुखण्यापुरती मर्यादित नाहीत. जेव्हा आपले हृदय योग्यरित्या कार्य करत नाही तेव्हा शरीराचे सर्वात नाजूक भाग, जसे की ओठ, त्यांचे परिणाम प्रथम दर्शवतात.

ओठांचा रंग बदलणे हे ऑक्सिजनच्या कमतरतेचे किंवा खराब रक्ताभिसरणाचे थेट लक्षण आहे. जर तुमचे ओठ निळे किंवा जांभळे झाले, जरी सर्दी नसली तरी, हे सामान्य नाही. हे हृदयरोगाचे संकेत आहे. याचा अर्थ तुमच्या शरीरात ऑक्सिजनची कमतरता आहे आणि ते थेट हृदयविकाराशी जोडलेले आहे.

जर ओठ कोणत्याही ॲलर्जीशिवाय कायम राहिले तर ते हृदयविकाराचे लक्षण असू शकते. जेव्हा हृदय योग्यरित्या पंप करत नाही तेव्हा शरीरात द्रव जमा होऊ लागतात, ज्यामुळे चेहरा आणि ओठांवर सूज येते. ओठ त्यांच्या सौंदर्यासाठी आणि रंगासाठी ओळखले जातात, परंतु जर ते पांढरे किंवा फिकट झाले तर ते हृदयात तसेच शरीराच्या इतर भागांमध्ये रक्त प्रवाह कमी झाल्याचे दर्शवते. ओठांच्या कोपऱ्यात वारंवार भेगा पडणे हे शरीरातील अंतर्गत जळजळ दर्शवते. ही जळजळ रक्तवाहिन्या आणखी कडक करू शकते, ज्यामुळे हृदयविकाराचा धोका वाढतो. जर तुमच्या ओठांवर काळे डाग दिसू लागले असतील किंवा अचानक दिसू लागले असतील तर ते तुमच्या शरीरातील रक्तवाहिन्यांमध्ये समस्या असल्याचे दर्शवते.

### रत्नजडीत साप

अनेक वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. एक नदीच्या काठावर दोन झोपड्या होत्या ज्यामध्ये दोन संन्यासी राहत होते. दोघेही भाऊ होते. त्याच नदीकाठी एक दुष्ट माणूस राहत होता जो सापासारखा दिसत होता आणि त्याच्याकडे एक रत्न होते ज्याच्याने तो नेहमी आपले पोशाख बदलत असे.

एके दिवशी तो नदीकाठी चालत होता. मग त्याची नजर त्याच्या झोपडीत बसलेल्या तरुण संन्यासीवर पडली. सापाची प्रवृत्ती असलेला तो दुष्ट माणूस त्याच्या जवळ गेला, त्याला अभिवादन केले आणि त्याच्याशी बोलू लागला. दोघेही पहिल्या दिवसापासूनच एकमेकांचे चांगले मित्र बनले. मग त्यांच्या बैठकांची वारंवारता वाढली; आणि ते दोघेही दर दोन दिवसांनी भेटू लागले.

एके दिवशी सापासारखा दुष्ट माणूस त्याच्या खऱ्या रूपात प्रकट झाला. त्याने त्या संन्यासीला त्याचे रत्नही दाखवले. त्याचे खरे रूप पाहून संन्यासीला धक्का बसला. यामुळे काही दिवसांतच त्यांची अवस्था बिकट झाली. जेव्हा त्या ज्येष्ठ संन्यासीने त्याची दुःखद अवस्था पाहिली तेव्हा त्याला त्याचे कारण जाणून घ्यायचे होते. आपल्या धाकट्या भावाची भीती ओळखून त्याने त्याला सल्ला दिला की त्याने त्या सापासारख्या दुष्ट माणसाची मैत्री सोडून द्यावी. आणि एखाद्याला दूर ठेवण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे त्याला प्रिय असलेली एखादी वस्तू मागणे. म्हणून, दुष्ट व्यक्तीला दूर ठेवण्यासाठी त्याने सापाकडून रत्न मागावे.

दुसऱ्या दिवशी जेव्हा तो संन्यासीच्या झोपडीत पोहोचला तेव्हा संन्यासीने त्याला त्याचे रत्न मागितले. हे ऐकून तो काहीतरी सबब सांगून लगेच तिथून निघून गेला. यानंतरही तो त्या संन्यासीला दोनदा भेटला; आणि प्रत्येक वेळी तो त्याचे रत्न मागत असे. मग त्याने दुरूनच त्याला नमस्कार केला आणि निघून गेला; आणि तो पुन्हा कधीही त्याच्यासमोर आला नाही.

तात्पर्य : कधीही कोणावर पटकन विश्वास ठेऊ नये.

## जीवन का अमृत (भाग १)



हमारा यह संसार भी आता है। इनके बीच में अनगिनत देश हैं और जो लोग एक सिरे से दूसरे सिरे तक यात्रा कर चुके हैं, वे अक्सर इनको, इनमें निहित सकारात्मक-आध्यात्मिक और नकारात्मक-भौतिक शक्तियों के अलग-अलग अनुपात के आधार पर, तीन अलग-अलग मंडलों में बाँटते हैं ।

मैंने अपने पिछले पत्र में आपको आश्वस्त किया था कि पाँच पवित्र नामों का जाप शक्तिशाली है और आपकी ओर आती किसी भी दुष्ट शक्ति या हस्ती से बचने का पक्का साधन हैं। आपको सिर्फ श्रद्धा और प्रेम के साथ आध्यात्मिक अभ्यासों में नियमित रूप से समय देना है। जब आप खाली हों, तो पवित्र नामों को याद करने की कोशिश करें या

### जीवन में तरक्की

सतगुरु की मीठी याद में खो जाएँ। गुरु-शक्ति सदा की साथी है और हर जरूरी सहायता प्रदान करेगी, चाहे आपको इसकी खबर हो या नहीं। अतः परेशान नहीं हों और नये साल में नई उम्मीदों के साथ, रास्ते पर प्रतिदिन तरक्की करो ।

अच्छे से अच्छा करो और बाकी सब, ऊपर काम कर रही गुरु-शक्ति पर छोड़ दो और सभी चिंताओं और तनावों से मुक्त हो जाओ। यह समय खुश और सुखी होने का है।

ध्यान के समय या और कभी भी, अगर आप कोई आवाज़ सुनें, तो बोलने वाले को प्रकट होने के लिए कहें। यदि वह आता है और पवित्र नामों के जाप के आगे ठहरता है, तब आप निश्चित हो सकते हैं कि वह आपका शुभ-चिंतक हैं; अगर नहीं तो उस ओर कोई ध्यान न दो और डरो नहीं । कोई भी आपके पास नहीं आएगा, न ही नुकसान पहुँचाएगा।

***

१५०. आपकी कठिनाई है कि भजन-अभ्यास के समय व्यापार संबंधी बातें आपके दिमाग में आती रहती हैं। ऐसा शायद इसलिए है, क्योंकि आपने भजन-अभ्यास को ठीक से करने की सही आदत नहीं डाली है मुझे पता लगा कि आपको कुछ ऋण चुकाने हैं और आपको एक पति और पिता के कर्तव्य भी निभाने हैं और इसके लिए जरूरत है कि आप अपने व्यापार में मेहनत से काम करें। आप इसे मन लगाकर करें। कर्म ही पूजा है । पर दिन के मेहनत भरे काम के बाद, समय है, पर्दा डालने का । उस समय, ८, ९, १० या रात ११ बजे, आप

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

अरुचिकर घटता है तो उसके इलाज के साथ साथ आज्ञा चक्र को जागृत करने का प्रयास भी करना चाहिए। विश्व का प्रत्येक व्यक्ति आज्ञा चक्र को जागृत कर सकता है। आज्ञा चक्र अगर जागृत हो जाता है तो बाकी सभी चक्र जागृत हो जाते हैं।

आज्ञा चक्र - ९१-साधना

विश्व में सभी धर्मों में जो साधनायें बताई हैं। उन का अभ्यास करने से आज्ञा चक्र को जागृत किया जा सकता है। ये विधियां तभी परिणाम देती हैं अगर ३ घंटे हर रोज अभ्यास किया जाये। आम व्यक्ति इतना समय नहीं लगा पाता। कुछ साधनाएं बहुत मुश्किल होती हैं जिस का प्रत्येक व्यक्ति लाभ नहीं ले पाता। आप जिस भी धर्म को मानते हैं। आप के धर्म में प्रचलित साधना को सीख कर कम से कम ३ घंटे हर रोज अभ्यास करें आप का आज्ञा चक्र जागृत रहेगा।

आज्ञा चक्र - ९२ - राजयोग

आज्ञा चक्र को जागृत करने के लिए ब्रह्मा

### जीवन में सदा संतुलन

कुमारीज द्वारा सिखाया जा रहा राजयोग सब से उत्तम और सहज है। इस का कोई भी किसी भी धर्म का व्यक्ति अभ्यास कर सकता है। किसी भी आरामदायक स्थिति में बैठ कर अभ्यास कर सकता है। बीमार व्यक्ति भी अभ्यास कर सकता है। इस का कोई साइड इफेक्ट नहीं है। इस राजयोग में भगवान को बिंदू माना गया है। भगवान को परमधाम निवासी माना गया है। कल्पना में भगवान को परमधाम में देखते हैं और भगवान के गुणों का सिमरण करते हैं। थोडा सा अभ्यास करने से ही बहुत अच्छी अनुभूति होने लगती है। राजयोग की विधि सीख कर आप चलते फिरते और काम करते हुए योग का अभ्यास कर सकते हैं और साधना का सुख महसूस कर सकते हैं। ऐसा अभ्यास करने से आज्ञा चक्र सदा संतुलन में रहेगा।

अरुचिकर घटता है तो उसके इलाज के साथ साथ आज्ञा चक्र को जागृत करने का प्रयास भी करना चाहिए। विश्व का प्रत्येक व्यक्ति आज्ञा चक्र को जागृत कर सकता है। आज्ञा चक्र अगर जागृत हो जाता है तो बाकी सभी चक्र जागृत हो जाते हैं।

आज्ञा चक्र - ९१

-साधना

विश्व में सभी धर्मों में जो साधनायें बताई हैं। उन का अभ्यास करने से आज्ञा चक्र को जागृत किया जा सकता है। ये विधियां तभी परिणाम देती हैं अगर ३ घंटे हर रोज अभ्यास किया जाये । आम व्यक्ति इतना समय नहीं लगा पाता। कुछ साधनाएं बहुत मुश्किल होती हैं जिस का प्रत्येक व्यक्ति लाभ नहीं ले पाता। आप जिस भी धर्म को मानते हैं। आप के धर्म में प्रचलित साधना को सीख कर कम से कम ३ घंटे हर रोज अभ्यास करें आप का आज्ञा चक्र जागृत रहेगा।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

मैत्रीण (रागाने) - एवढा उशीर का झाला? मी कधीपासून वाट पाहत आहे.

प्रियकर - बॉसने थांबवले होते, त्याच्यासोबत जेवत होतो.

मैत्रीण - काय खाल्लस?

प्रियकर- शिव्या

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* देशातील एकमेव मोनोरेल सेवा कोठे सुरू आहे?

- मुंबई

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद - आरोग्य संवर्धन

१४. तुपामध्ये असणाऱ्या 'के-२' जीवनसत्त्वामुळे रसरक्तपुरवठा सुरळीत होतो.

१५. वंध्यत्व असणाऱ्या महिलेने गायीच्या तुपापासून बनविलेल्या फलघृताचा औषध म्हणून वापर करावा. याने गर्भधारणेसाठी आवश्यक असणाऱ्या प्रोजेस्ट्रेरॉन हार्मोन्सची निर्मिती होण्यास मदत होते.

१६. नियमितपणे गायीचे तूप खाल्ल्याने शरीरातील वाईट कोलेस्टेरॉलची निर्मिती रोखली जाऊन चांगल्या कोलेस्टेरॉलची निर्मिती होते. त्यामुळे आपोआपच हृदयविकार, उच्च रक्तदाब, कॅन्सर असे विकार होत नाहीत.

१७. कोमट दुधामधून दोन चमचे गायीचे तूप रात्री झोपताना घेतल्यास आतड्यांना मृदुता निर्माण होऊन त्यांची हालचाल वाढते व शौचास साफ होते, म्हणून मलावष्टंभाची तक्रार असणाऱ्यांनी रोज रात्री हा प्रयोग करावा.

### तूप कसे बनवावे?

१८. वंध्यत्व असणाऱ्या पुरुषांनी आहारामध्ये रोज गायीच्या तुपाचे सेवन करावे. यामुळे शुक्रधातूचे पोषण होऊन लैंगिक क्षमता व शुक्रजंतूंची संख्या वाढते.

सावधानता :

शक्यतो तूप घरीच लोण्यापासून कढवून बनवावे. बाजारामधील तुपामध्ये वनस्पती तुपाची भेसळ असण्याची शक्यता असते, म्हणून बाजारामधील गायीचे तूप विकत घ्यायचे असेल, तर मान्यताप्राप्त व नामांकित कंपनीचेच घ्यावे.

### मध

विविध प्रकारच्या फुलांमधून मधुर रस शोषून मधमाश्या आपल्या लहान शरीरात त्याचा साठा करून मधाच्या पोळ्यामध्ये असणाऱ्या लहान लहान कोषात त्या तो रस साठवतात व त्या रसालाच मध असे म्हणतात. मराठीमध्ये 'मध', इंग्रजीमध्ये 'हनी', संस्कृतमध्ये 'मधु', तर शास्त्रीय भाषेमध्ये 'हनी' या नावाने मध परिचित आहे. मधमाश्यांनी मध निर्माण करून मनुष्यासाठी एक देणगीच दिलेली आहे. मधामध्ये अनेक पौष्टिक व औषधी गुणधर्म आहेत. मध हा अर्धपारदर्शक, अर्धप्रवाही, सोनेरी लालसर रंगाचा, गोड व काहीसा तुरट चवीचा सुगंधी पदार्थ आहे. मधमाश्या इमारतीमध्ये, झाडांवर, झुडुपांवर, पर्वतावर मधमाश्याचे मोहोळ तयार करतात. मधमाश्या आहार म्हणून मधाचा उपयोग करतात.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर

अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००



महाशिवरात्रीच्या निमित्त फुलसौंदर मळा येथे आयोजित अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे उद्घाटन ह.भ.प. अमोल महाराज जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी नगरसेविका सुनिता फुलसौंदर, भिंगार बँकेचे संचालक विष्णू फुलसौंदर, अनिल साळुंके , भास्करराव गायकवाड, राजू फुलसौंदर, रघुनाथ केदार, लक्ष्मण आव्हाड, सुभाष राऊत यांच्यासह महिला व भाविक उपस्थित होते.

# हरिनाम सप्ताहातून समाजात सकारात्मक विचारांची पेरणी

### भगवान फुलसौंदर यांचे प्रतिपादन; महाशिवरात्रीनिमित्त अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायणास भक्तिभावात प्रारंभ

नगर – आजच्या धकाधकीच्या जीवनात माणूस मानसिक तणावात सापडलेला आहे. अशा वेळी हरिनामाचा गजर, संतवाणीचे चिंतन आणि ज्ञानेश्वरीसारख्या ग्रंथाचे पारायण हे मनाला शांती देणारे ठरते. या सप्ताहामुळे केवळ अध्यात्मिक समाधान मिळत नाही, तर समाजात सकारात्मक विचारांची पेरणी होते. तरुण पिढीला योग्य मार्गावर आणण्यासाठी असे उपक्रम अत्यंत आवश्यक आहेत, असे माजी महापौर भगवान फुलसौंदर म्हणाले यांनी सांगितले.

महाशिवरात्रीच्या निमित्त फुलसौंदर मळा येथे आयोजित अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे उद्घाटन ह.भ.प. अमोल महाराज जाधव यांच्या हस्ते पार पडले. अध्यात्म, भक्ती आणि सामाजिक सलोखा यांचा संगम असलेला हा सप्ताह यंदा २७ व्या वर्षात पदार्पण करत असून, परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे.

विष्णू फुलसौंदर म्हणाले की संत ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम महाराज यांनी समाजाला समतेचा, बंधुभावाचा आणि मानवतेचा संदेश दिला. ज्ञानेश्वरी पारायण म्हणजे केवळ धार्मिक विधी नसून जीवन जगण्याची शिकवण आहे. या ग्रंथातील विचार आजही तितकेच समर्पक आहेत. फुलसौंदर मळ्याने सलग २७ वर्षे ही परंपरा अखंड सुरू ठेवली, ही निश्चितच अभिमानाची बाब आहे. अशा उपक्रमांमुळे समाजात एकता नांदते आणि संस्कृती टिकून राहते, असे त्यांनी विचार मांडले.

उद्घाटन सोहळ्यास नगरसेविका सुनिता फुलसौंदर, भिंगार बँकेचे संचालक विष्णू फुलसौंदर, अनिल साळुंके, भास्करराव गायकवाड, राजू फुलसौंदर, रघुनाथ केदार, लक्ष्मण आव्हाड, सुभाष राऊत, अवधूत फुलसौंदर, अक्षय फुलसौंदर, पोपट राऊत, गणेश फुलसौंदर, गणेश माने, अशोक खाडे, विकास गिरी भाऊ फुलसौंदर, गणेश दिंडे, सचिन लगे, अविनाश फुलसौंदर, गणेश डमाळे, धनंजय फुलसौंदर, नितीन फुलसौंदर, पृथ्वी फुलसौंदर, अभिजीत ठमके यांच्यासह महिला व भाविक उपस्थित होते.

या अखंड हरिनाम सप्ताहात राज्यातील नामवंत कीर्तनकारांची सेवा लाभणार असून, दररोज हरिपाठ, ज्ञानेश्वरी पारायण, प्रवचन व कीर्तनाच्या माध्यमातून भक्तांना आध्यात्मिक ऊर्जा मिळणार आहे. सप्ताहाच्या निमित्ताने परिसरात भक्ती, शिस्त आणि सेवाभावाचे वातावरण निर्माण झाले आहे. सूत्रसंचालन भास्करराव गायकवाड यांनी केले. अनिल साळुंके यांनी आभार मानले. सप्ताहाच्या यशस्वी आयोजनासाठी महाशिवरात्र उत्सव समिती, श्री वैष्णव मित्र मंडळ व महिला भगिनींचे सहकार्य मोलाचे ठरत आहे.

# प्रेरणादायी अक्षरधन

## स्वरात ओंकार भेटला गा

"मुसाफिर" वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन
संकलन: दिशान फिचर्स

समाज मनाला सुखावणारी चैतन्य पालवी
डॉ. रामचंद्र देखणे
'चपराक' प्रकाशित ललित चिंतन

भारताला संगीत आणि कलेची महान परंपरा लाभली आहे. ही परंपरा वेदांइतकी प्राचीन आहे. संगीताचा प्रथम आविष्कार सामवेदातून प्रकटला. गीतेमध्ये विभूतीयोग सांगताना म्हटले आहे की, 'वेदांना सामवेदोस्मि।' मी वेदांमधील सामवेद आहे. सामवेदाने गायनातून परमात्म्याला जाणले आहे. संगीत हे ईश्वराने माणसाला दिलेले सर्वात मोठे दान आहे तर हिंदुस्थानी संगीत हे भारताने जगाला दिलेले वरदान आहे. हिंदुस्थानचे भाग्य असे की इथेच अरूपाला रूप देणारे शिल्पकारही आहेत आणि स्वरांना बोलते करणारे संगीतकारही. संगीत ही श्रेष्ठ दर्जाची श्रवणविद्या आहे. प्रत्येक 'क्रियेत' किंवा 'उपासने'मध्ये साध्य आणि साधन अशा दोन बाबी असतात. साधन हे खडतर असते तर साध्य हे आनंददायी असते.

संगीत प्रकारात साधन आणि साध्य हे दोघेही आनंददायी आणि दोघेही एकरूप आहेत. संगीतातील 'सम' आणि 'गीत' हे दोन शब्द दोन प्रकाराच्या माधुर्याचे प्रकटीकरण करतात. सम हा शब्द गायनातील श्रुतीमाधुर्य तर गीत हा नादमाधुर्य प्रकट करतो. संगीताचे सामर्थ्य काय आहे ? पु.लं. देशपांडे यांनी आकाशवाणीवर पंडित भीमसेन जोशी यांची मुलाखत घेतली होती. त्यात त्यांनी म्हटले आहे की पंडित भीमसेन जोशी यांची पहिली बैठक पुलंच्याच घरी झाली. त्यांनी त्यावेळी मियामल्हार राग गायला आणि खरोखरीच बाहेर धो धो पाऊस सुरू झाला.

असे म्हटले जाते की तानसेनच्या गाण्याने दिवे लागत. तानसेनची कथा खरी आहे याची प्रचिती आली. यातला महत्त्वाचा भाग असा की संगीतातले रागही निसर्गाच्या मनोधर्माशी जोडले गेले आहेत. त्या त्या वेळेला आणि समयाला समुचित अशी स्वरांची मांडणी त्यात आहे. म्हणूनच मानवी मनाचे सगळे भाव रागातून प्रकटतात. राग हे मानवी मन व्यक्त करणारे सांगितिक सत्य आहे. इथे स्वरातही ओंकार भेटतो आणि स्वरातला ओंकार अनुभूतीला उतरतो. पं. भीमसेन जोशी यांचे जानेवारी २०११ मध्ये दुःखद निधन झाले. त्या वेळी प्रसिद्ध कवी विंदा करंदीकरांनी त्यांच्यावर कविता लिहिली.

अमृताचे डोही बुडविले तुम्ही
बुडताना आम्ही धन्य झालो ।
मी पण संपले झालो विश्वाकार।
स्वरात ओंकार भेटला गा ।।

– किशोर गांधी

# केडगाव येथील 'विदर्भ मित्र मंडळाच्या'वतीने गजानन महाराज मंदिरात प्रकट दिन साजरा




नगर – अहिल्यानगर येथील लिंक रोड साईनगर केडगाव येथील विदर्भ मित्र मंडळाच्या गजानन महाराज मंदिरामध्ये प्रकट दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्यात सकाळी ८:३० वाजता अभिषेक त्यानंतर ९:३० ते १०:३० या वेळेत पारायण झाले. या पारायणात ३० भाविकांनी सहभाग नोंदवला. त्यानंतर ११ ते १२:३० वा. केदार महाराज यांचे कीर्तन झाले. त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन केले होते.

यानिमित्त मोफत दंत चिकित्सा शिबिर घेण्यात आले. विदर्भ मित्र मंडळाच्या गजानन महाराजांच्या मंदिराचे अध्यक्ष शरद कोलते म्हणाले की, मूळचे विदर्भातील आणि आता नगरमध्ये स्थायिक झालेल्या समविचारी मंडळींनी एकत्र येऊन संत गजानन महाराज मंदिर उभारले आहे. दर गुरुवारी मंदिरात पूजा केली जाते व विविध कार्यक्रमांचे आयोजन सुद्धा केले जाते. रक्ताचा तुटवडा कमी असल्याकारणाने रक्तदान तसेच विविध सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करण्याचा प्रयत्न आहे. संतांच्या विचारांमुळे समाजात आनंदी वातावरण तयार होण्यास मदत होते.

कार्यक्रमात भस्मे सर, साळवे सर, कुंभारे सर, सराफ सर, धनभर सर, सचिन गोळे, इंगळे, धकाते सर, किलोर, सागर वानखेडे, विजयकर, पटेल मॅडम, उमक, स्वाती वडाळकर, जाधव टी, तारकस, देवतकर, कुदळे सर, आंबटकर, पोकळे, धुमने राजू, विकास हाडोळे, संगीता केसकर, मीना भारस्कर, दानी मॅडम, सिंधू जोशी, अनुराधा भोयर, शितल गुजराती, स्नेहल भोयर, वैशाली पोळ, दीपाली देऊतकर आदींसह सर्व सभासद व भाविकांनी सहभाग नोंदवला.

# श्री मार्कंडेय मंदिरात सद्‌गुरू श्री गजानन महाराज प्रकट दिन उत्साहात





नगर – सद्‌गुरू श्री गजानन महाराज प्रकट दिन सालाबाद प्रमाणे श्री मार्कंडेय मंदिर देवस्थान, गांधी मैदान, अहिल्यानगर येथे उत्साहात साजरा करण्यात आला. प्रकट दिन निमित्त सकाळी श्रेणीचा रुद्राभिषेक तसेच प्रसाद वाटप असा कार्यक्रम झाला. त्यानंतर सायंकाळी ५ वाजता श्रीं चे पूजन करण्यात आले. सदनंतर श्री महालक्ष्मी महिला भजनी मंडळाचा भजनांचा कार्यक्रम, सायंकाळी ७ वाजता महाआरती, रात्री ८ वाजता महाप्रसादाचे वाटप, संध्या. ८:३० ते रात्री १० वाजता भजन संध्याने प्रकट दिन उत्स्फूर्तपणे साजरा झाला.

श्री गजानन महाराज यांच्या प्रकट दिनानिमित्त श्री मार्कंडेय देवस्थान च्या वतीने भाविकांसाठी पायनापल शिरा, पिठल, पोळी, पुलाव, ठेचा आदी महाप्रसाद वाटप करण्यात आले. या महाप्रसादाचा तीन हजाराच्या जवळपास भाविक भक्तांनी लाभ घेतला तसेच मंदिरामध्ये दर्शनासाठी भाविकांनी गर्दी केली होती. श्री मार्कंडेय देवस्थान आवारा मधील श्री गजानन महाराज मंदिरास आकर्षक फुलांची सजावट विद्युत रोषणाई करण्यात आली त्यामुळे मंदिरात भक्तिमय आणि प्रसन्न वातावरण निर्माण झाले होते.

श्री मार्कंडेय देवस्थान च्या वतीने दरवर्षी श्री सद्‌गुरू गजानन महाराज प्रकट दिनानिमित्त महाप्रसादासाठी सहकार्य करणाऱ्या भाविक भक्तांचे देवस्थानचे उपाध्यक्ष त्रिलेश येनगंदुल यांनी आभार व्यक्त केले. तसेच वर्षभरात विविध धार्मिक उत्सवाचे आयोजन श्री मार्कंडेय देवस्थानच्या वतीने केले जाते, त्यात श्री मार्कंडेय जयंती, श्री गणेश जयंती, महाशिवरात्री उत्सव, श्रीराम नवमी, श्री हनुमान जयंती, श्री दत्त जयंती, धर्मनाथबीज उत्सव, श्री गजानन महाराज प्रकट दिन, आषाढी एकादशी उत्सव, नारळी पौर्णिमा उत्सव, रक्षाबंधन उत्सव, या उत्सवांच्या माध्यमातून अनेक धार्मिक सामाजिक उपक्रम वर्षभर देवस्थानच्या वतीने राबविण्यात येत असल्याची माहिती देवस्थानचे ज्ञानेश्वर मंगलारम यांनी दिली.

श्री गजानन महाराज प्रकट दिन उत्सव यशस्वीतेसाठी देवस्थानचे सर्व पदाधिकारी व श्री मार्कंडेय मॉर्निंग ग्रुपचे सर्व सदस्य, कुमार आडेप, वाय प्रकाश टेलर, रघुनाथ गाजेंगी, दत्तात्रय जोग, रमाकांत बिज्ञा, गणेश आकेन, विनायक बत्तीन, शिवाजी संदुपटला, सागर सब्बन, शंकर नक्का, अंबादास चाटला, अंबादास रच्चा, अजय गुरुड, रमेश कोंडा, श्रीनिवास वंगारी, हनुमान म्याकल, शंकर मुत्याल, व्यंकटेश नक्का, प्रमोद अंकम, शुभम सुंकी, श्रीनिवास एलाराम, श्रीनिवास बुरगुल, विजय मच्चा, बालकिसन आकूल, दिलीप गटने, श्रीनिवास श्रीगादी, शेखर दिकोंडा, नितीन कामुनी आदी कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# 'संत रविदास महाराज चौक' या नामफलकाचे अनावरण

नगर – श्रीगोंदा येथील वडघुल गावात संत शिरोमणी रोहिदास महाराज यांच्या जयंतीनिमित्त उत्साहपूर्ण वातावरणात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी आमदार विक्रमसिंह पाचपुते यांच्या हस्ते 'संत रविदास महाराज चौक' या नामफलकाचे अनावरण करण्यात आले. त्यानंतर संत रोहिदास महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला.

कार्यक्रमात बोलताना आमदार विक्रमसिंह पाचपुते म्हणाले की, साधुसंतांनी दिलेला समतेचा आणि मानवतेचा संदेश आजच्या युगातही तितकाच प्रेरणादायी आहे. संत रोहिदास महाराजांनी आपल्या कार्यातून समाजाला भक्ती आणि शक्तीचा मार्ग दाखवला. त्यांच्या विचारांनी समाजात एकता आणि प्रेरणा निर्माण होत असून, नव्याने नामकरण झालेला संत रोहिदास चौक समाजासाठी प्रेरणास्थान ठरेल, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

### संत शिरोमणी रोहिदास महाराज जयंती उत्साहात साजरी




श्रीगोंदा येथील वडघुल गावात आमदार विक्रमसिंह पाचपुते यांच्या हस्ते 'संत रविदास महाराज चौक' या नामफलकाचे अनावरण करण्यात आले.

या सोहळ्यास सरपंच राम घोडके, चर्मकार संघाचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब केदारे, भाजप जिल्हा सचिव बाळासाहेब महाडिक, चेअरमन संभाजी टकले, संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष शाम झरे, भाजप तालुका अध्यक्ष डॉ. युवराज भोसले, अनिल शिंदे, संजय टकले, रवी बडवे, चंद्रकांत केदारे, संदीप केदारे, अनिल केदारे, सुरेश केदारे, सोमनाथ केदारे, शंकर सोनवणे, विकास केदारे, गोरख केदारे, आबू पवार, सुभाष टकले, बापू पवार यांच्यासह विविध संस्थांचे पदाधिकारी व समाजबांधव उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान सरपंच राम घोडके आणि बाळासाहेब महाडिक यांनी वडघुल या छोट्या गावात चर्मकार बांधवांसाठी बसण्या–उठण्यासाठी भव्य सभामंडप उभारण्यासाठी निधी देण्याची मागणी आमदार पाचपुते यांच्याकडे केली. या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत आमदार पाचपुते यांनी सभामंडप उभारण्यासाठी दहा लाख रुपयांचा निधी देण्याची घोषणा केली.

या घोषणेनंतर उपस्थित कार्यकर्ते व भाविकांनी 'संत रोहिदास महाराज की जय'च्या घोषणांनी संपूर्ण वडघुल परिसर दुमदुमून गेला. चर्मकार समाजाच्या वतीने चर्मकार महासंघाचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब केदारे यांनी आभार मानले.

तसेच राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे संस्थापक अध्यक्ष व माजी समाजकल्याण मंत्री बबनराव घोलप यांच्या नेतृत्वाखाली व प्रदेश कार्याध्यक्ष शिवाजी साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात समाजासाठी सातत्याने काम सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले.

# महाशिवरात्रीनिमित्त १० फेब्रुवारी रोजी नागरदेवळेत मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर

### फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्यावतीने लाभ घेण्याचे आवाहन

नगर – फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या वतीने महाशिवरात्रीच्या पावन पर्वानिमित्त नगर तालुक्यातील नागरदेवळे येथे मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर १० फेब्रुवारी रोजी नागरदेवळे येथील संत सावता महाराज मंदिर परिसरात पार पडणार आहे. या शिबिराचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन फिनिक्स सोशल फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जालिंदर बोरुडे यांनी केले आहे.

या शिबिरामध्ये तज्ज्ञ नेत्ररोग डॉक्टरांकडून अद्ययावत यंत्रसामग्रीच्या सहाय्याने मोफत नेत्र तपासणी करण्यात येणार आहे. यासोबतच जेष्ठ नागरिकांसाठी रक्तदाब, मधुमेह तसेच इतर आवश्यक आरोग्य तपासण्या देखील मोफत करण्यात येणार आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना एकाच ठिकाणी सर्वसमावेशक आरोग्य सेवा मिळणार आहे.

नेत्र तपासणीनंतर ज्यांना शस्त्रक्रियेची आवश्यकता भासेल, अशा रुग्णांवर पुणे येथील के.के. आय बुधराणी हॉस्पिटलमध्ये मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. यामध्ये मोतीबिंदू, काचबिंदू तसेच लहान मुलांच्या तिरळेपणावरील शस्त्रक्रियांचा समावेश आहे. विशेष बाब म्हणजे, या शस्त्रक्रियेसाठी रुग्णांचे पुणे येथे येणे–जाणे, राहण्याची व जेवणाची संपूर्ण व्यवस्था मोफत करण्यात आली आहे.

या शिबिरासाठी नाव नोंदणी करण्यासाठी किंवा अधिक माहितीसाठी जालिंदर बोरुडे (मो. ९८८१८१०३३३) या क्रमांकावर संपर्क साधावा, असे फाऊंडेशनच्या वतीने सांगण्यात आले आहे.



न्यू लॉ कॉलेज, अहिल्यानगर येथे आयोजित कै. न्यायमूर्ती एस. बी. म्हसे पाटील आठव्या राज्यस्तरीय अभिरूप न्यायालय स्पर्धेचे दीपप्रज्वलनाने उद्घाटन करताना न्यायमूर्ती किशोर सी. संत. (छाया – समीर मन्यार)

# अभिरूप न्यायालयाच्या माध्यमातून वकिली व्यवसायाच्या विविध कला विकसित करण्याची संधी : न्या. किशोर संत

नगर – अभिरूप न्यायालयाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वकिली व्यवसायातील विविध कला, गुण व कौशल्ये विकसित करण्याची संधी मिळते. कायद्यातील विसंगती, त्रुटी तसेच बारकावे समजून घेण्यासाठी अशा स्पर्धा अत्यंत उपयुक्त ठरतात. वकिलांनी न्यायालयासमोर उभे राहताना नेहमीच पूर्ण तयारीनिशी व खटल्याचा सखोल अभ्यास करूनच यावे, असे प्रतिपादन न्यायमूर्ती किशोर सी. संत (उच्च न्यायालय, मुंबई – औरंगाबाद खंडपीठ) यांनी केले. ते येथील न्यू लॉ कॉलेज, अहिल्यानगर येथे आयोजित कै. न्यायमूर्ती एस. बी. म्हसे पाटील आठव्या राज्यस्तरीय अभिरूप न्यायालय स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. यावेळी दीपप्रज्वलन करून कै. न्यायमूर्ती एस. बी. म्हसे पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे सचिव ॲड. विश्वासराव आठरे पाटील यांनी संस्थेच्या वाटचालीचा आढावा घेतला. न्यायमूर्ती एस. बी. म्हसे यांच्या नावाने ही अभिरूप न्यायालय स्पर्धा सुरू करण्यात आल्याचे सांगून त्यांच्या न्याय क्षेत्रातील योगदानाचे कौतुक केले. तसेच विद्यार्थ्यांना वकिली व्यवसायातील महत्त्वाच्या टिप्स व मार्गदर्शन केले.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे, खजिनदार ॲड. दीपलक्ष्मी म्हसे, सौ. निलिमा संत, प्रधान जिल्हा न्यायाधीश ए. एम. पाटील, कार्यकारिणी सदस्य ॲड. माणिक मोरे, सौ. अरुणा काळे, सौ. अलका जंगले, ॲड. सी. के. शिंदे, अमेरिका येथून आलेले विशेष निमंत्रित डॉ. बाबासाहेब सोनवणे, समन्वयक प्रा. विजयकुमार शिंदे, प्रभारी प्राचार्य डॉ. ए. एल. मोरे, अभिरूप न्यायालयाचे न्यायाधीश ॲड. मानसी घाणेकर, ॲड. वैशाली चौधरी, ॲड. प्रीती वानखेडे, ॲड. रश्मी गौर, ॲड. प्रतिभा भराड, ॲड. परिक्रमा खोत आदी उपस्थित होते. या स्पर्धेत राज्यभरातील विविध विधी महाविद्यालयांचे एकूण १९ संघ सहभागी झाले आहेत.

प्रास्ताविक ॲड. माधवेश्वरी म्हसे यांनी केले. त्यांनी गेल्या सात स्पर्धांचा आढावा घेत स्पर्धेचा आलेख दिवसेंदिवस वाढत असल्याचे सांगितले. पाहुण्यांची ओळख प्रा. सुहास तोरडमल यांनी करून दिली. डॉ. बी. डी. पांढरे यांनी आभार मानले. सूत्रसंचालन प्रा. प्रियंका खुळे व प्रा. डॉ. रामेश्वर दुसुंगे यांनी केले.

# वकिलांनी व न्यायाधीशांनी मिळून न्याय संस्था टिकवण्यासाठी काम करावे

### प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश अंजू शेंडे यांचे प्रतिपादन; बार असोसिएशनच्या वतीने निरोप समारंभाचे आयोजन



प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश अंजू शेंडे यांना अहमदनगर बार असोसिएशनच्या वतीने निरोप देण्यात आला. यावेळी बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड.कृष्णा झावरे, जिल्हा सरकारी वकील सतीश पाटील, सतीशचंद्र सुद्रिक, उपाध्यक्ष ॲड.भाऊसाहेब घुले, आदींसह पदाधिकारी व वकील वर्ग.

नगर – नगरमध्ये जिल्हा न्यायाधीशपदी रुजू झाल्यावर शिर्डी साईबाबा देवस्थान व मोहटादेवी वेवस्थान या दोन्हींची जबाबदारी सांभाळली. साईबाबांच्या व देवीच्या आशीर्वादाने तसेच सर्वांच्या सहकार्याने येथे चांगले काम करण्याची संधी मला मिळाली. जिल्हा न्यायालयाच्या इमारतीत नवा कॉन्फरन्स बांधणे आवश्यक होते त्यामुळे त्या कामास प्राधान्य दिले. येथे आल्यावर सुरुवातीला तक्रार पेटीत काही तक्रारी मिळाल्या होत्या; मात्र येथून माझी बदली होईपर्यंत तक्रार पेटी कायम रिकामीच राहिली. कोणीही प्रकार केली नाही. बार असोसिएशनचे खूप सहकार्य मिळाले त्यामुळेच चांगले काम करू शकले. येणाऱ्या काळात असेच उत्कृष्ट काम करून वकिलांनी व न्यायाधीशांनी मिळून ही न्याय संस्था टिकवण्याचे काम करून उत्तमप्रकारे आपले कर्तव्य पार पाडावे व पक्षकारांना न्याय मिळवून द्यावा. येथे येणाऱ्या नव्या जिल्हा न्यायाधीशांनाही असेच सहकार्य करावे, असे प्रतिपादन प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश अंजू शेंडे यांनी केले.

प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश अंजू शेंडे यांची नुकतीच मुंबई येथे उच्च न्यायालयात विशेष पदावर नियुक्ती झाली आहे. यानिमित्ताने अहमदनगर बार असोसिएशनच्या वतीने त्यांच्या निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड.कृष्णा झावरे यांनी शाल व बुके देऊन न्यायाधीश शेंडे यांचा सत्कार केला. जिल्हा न्यायालयात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विधीज्ञ सतीशचंद्र सुद्रिक होते. यावेळी जिल्हा सरकारी वकील सतीश पाटील, बार असोसिएशनचे उपाध्यक्ष भाऊसाहेब घुले, खजिनदार ॲड. वसीम खान, सहसचिव ॲड. अमोल अकोलकर, माजी अध्यक्ष राजेश कातोरे तसेच वकील वर्ग उपस्थित होता. यावेळी लॉयर्स सोसायटीच्या वतीने संचालिका अनिता दिघे व विनायक सांगळे यांनी न्यायाधीश शेंडे यांचा सत्कार केला.

ॲड.सतीश पाटील म्हणाले, जिल्हा न्यायालयात प्रथम महिला प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश म्हणून अंजू शेंडे यांनी खूप उत्कृष्ट कामकाज पाहिले. त्यांच्या १५ महिन्याच्या कालावधीत त्यांनी न भूतो असेच उत्कृष्ट काम केले. सर्वांना बरोबर घेतले व सर्वांचे मनही जिंकले. न्यायिक अधिकारी, वकील व कर्मचाऱ्यांचे अनेक प्रश्न सोडवण्यास त्यांनी प्राधान्य दित धडाडीचे निर्णय घेतले. त्यांनी जिल्हा न्यायालयातील प्रश्न उत्तर सोडवलेच शिवाय तालुका स्तरावरही विविध प्रश्न सोडून सुविधा पुरवल्या.

ॲड.सतीश सुद्रिक म्हणाले जेव्हा एखाद्या घरात स्त्री आल्यावर घराला जसे घरपण येते तसे जिल्हा न्यायालयात महिला न्यायाधीश अंजू शेंडे आल्यावर न्यायालयाला घरपण आले. न्यायाधीश अंजू शेंडे यांनी ज्युनिअर वकिलांना पूर्ण सहकार्य करून प्रोत्साहन दिले. त्यांच्यात कधीही अहंकार दिसला नाही.

प्रास्तविकात ॲड.कृष्णा झावरे म्हणाले, अहमदनगर जिल्हा न्यायालयात जिल्हा व सत्र न्यायाधीश अंजू शेंडे यांनी अहमदनगर बार असोसिएशनला भरपूर सहकार्य केले. त्यामुळे त्यांच्या काळात उत्कृष्ट कामकाज झाले. सर्व वकिलांना त्यांनी कायम मार्गदर्शन व सहकार्य केले, असे सांगून त्यांना मुंबई उच्च न्यायालयातील कामकाजासाठी शुभेच्छा दिल्या.

सूत्रसंचालन ॲड.युवराज पाटील यांनी केले. असोसिएशनचे सहसचिव ॲड.अमोल अकोलकर यांनी आभार मानले. यावेळी माजी अध्यक्ष मुकुंद पाटील, ॲड. विक्रम वाडेकर, ॲड. रफिक बेग, प्रभाकर शहाणे, संतोष वाळुंज, बाबासाहेब खेडकर, प्रज्ञा उजागरे, विजया कोतकर, प्राजक्ता करांडे, गजेंद्र पिसाळ, विशाल पांडुळे आदींसह वकील वर्ग उपस्थित होता.

# मनपाच्या माध्यमातून शी मार्ट योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पुढाकार घेणार

## भाजपा महिला आघाडीच्या कार्यक्रमात महापौर ज्योती गाडे यांचे आश्वासन



शहर भाजपच्या महिला आघाडीच्या वतीने देशाच्या अर्थसंकल्पात महिलांना लाभ या चर्चासत्राचे उद्घाटन करताना महापौर ज्योती गाडे.

नगर - महिलांनी शासनाच्या योजनांचा लाभ घेऊन पुढे जावे. देशाच्या अर्थमंत्री निर्मला सितारामण यांनी अर्थसंकल्पात महिलांना स्वावलंबी व सक्षम होण्यासाठी शी मार्ट योजना सुरु केली आहे. ही महिलांसाठी अत्यंत उपयुक्त योजन असल्याने अहिल्यानगर महानगरपालिकेच्या माध्यमातूनही या योजनेच्या प्रभावी अमलबजावणी साठी मी पुढाकार घेणार आहे. भाजपच्या महिला आघाडीने देशाच्या अर्थसंकल्पावर चर्चासत्राचे आयोजन करून योग्य उपक्रम राबवला आहे, असे प्रतिपादन शहराच्या महापौर ज्योती गाडे यांनी केले.

नुकत्याच सादर झालेल्या देशाच्या अर्थसंकल्पातील योजनांचा महिलांना लाभ याबाबत अहिल्यानगर शहर भाजपच्या महिला जिल्हाध्यक्षा प्रिया जानवे यांनी विशेष चर्चा सत्राचे आयोजन केले होते. याचे उद्घाटन महापौर ज्योती गाडे यांच्या हस्ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाले. यावेळी सिए सुनंदा रच्चा, सिए समृद्धी कलेढोणकर, नगरसेविका मयुरी जाधव, महिला आघाडीच्या सरचिटणीस संध्या पावसे, सुजाता औटी यांच्यासह पदाधिकारी व महिला उपस्थित होत्या. यावेळी महापौरपदी ज्योती गाडे यांची झालेल्या निवडीबद्दल भाजपा महिला आघाडीच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

सिए सुनंदा रच्चा म्हणाल्या, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशास २०४७ पर्यंत विकसित भारत करण्याचा संकल्प केला आहे. त्या दृष्टीने देशाच्या अर्थमंत्री निर्मला सीतारामण या देशाचा अर्थसंकल्प सादर करत आहेत. देशातील महिलांना केंद्रस्थानी ठेवून मोठ्याप्रमाणात योजना सुरु आहेत. यातील नव्या शी मार्ट योजना ही महिला उद्योजकांसाठी खूप लाभदायक आहे, असे सांगून अर्थसंकल्पातील महिलांच्या विविध ठळक बाबी त्यांनी सांगितल्या.

सिए समृद्धी कलेढोणकर यांनी महिलांना बचतीचे महत्व सांगून घरातील प्रत्येक स्त्रीने बचतीसाठी पुढाकार घेतला पाहिजे. दरवर्षी १० टक्क्यांनी बचत वाढवली पाहिजे, असे सांगून बचतीचे विविध मुद्दे सांगितले.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात प्रिया जानवे म्हणाल्या, पंतप्रधान नरेंद्र मोदी हे महिलांच्या मागे ठामपणे उभे आहेत. अर्थमंत्री निर्मला सीतारामण यांनी या वर्षीच्या अर्थसंकल्पात महिलांना प्राधान्य दिले आहे. या योजनांचा लाभ सर्व महिलांनी घ्यावा. नगर शहरातून जास्तीत जास्त महिला लखपती दीदी करण्याचा संकल्प भाजपा महिला आघाडीने केला आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शारदा होशिंग यांनी केले. संध्या पावसे यांनी आभार मानले. यावेळी कालिंदी केसकर, रेखा मैड, रेणुका करंदीकर, सुरेखा जंगम, श्वेता झोंड, सविता कोटा, लीला अग्रवाल, रजनी भंडारी, मीरा सरोदे व स्वाती पवळे आदींसह महिला उपस्थित होत्या.

# रमेश फिरोदिया आर्किटेक्चर महाविद्यालयात विद्यार्थ्यांचा 'वार्षिक स्नेहसंमेलन' सोहळा

## महापौर सौ. ज्योतीताई गाडे यांचे हस्ते पारितोषिक वितरण सोहळा



रमेश फिरोदिया आर्किटेक्चर महाविद्यालयात विशेष नैपुण्य प्राप्त विद्यार्थ्यांना महापौर सौ.ज्योतीताई अमोल गाडे यांचे हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले.

नगर - अहिल्यानगर जिल्ह्यातील रमेश फिरोदिया आर्किटेक्चर महाविद्यालयांत विद्यार्थ्यांचा स्नेहसंमेलनाचा सोहळा झाला. या प्रसंगी नवनिर्वाचित महापौर झाल्यावर पहिले आमंत्रण स्विकारल्या बद्दल प्राचार्यानी त्यांचे आभार मानले. सौ. ज्योतीताईंचा सर्वात प्रथम सत्कार करण्यात आला.

यानंतर महाविद्यालयातील विविध खेळांत व सांस्कृतिक कार्यक्रमांत विशेष नैपुण्य प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना महापौर सौ.ज्योतीताई अमोल गाडे यांचे हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले.

राजकिय तसेच विशेषतः सामाजिक कार्यांत अग्रेसर राहताना शहर व्यवस्थापन, स्वच्छता, घनकचरा प्लॅस्टिक वापर निर्मूलन, शहर सौंदर्यीकरण, मुलभूत नागरी सुविधा, वाहतूक सुरक्षा व व्यवस्थापन, वाहन पार्किंग, भाजीपाला मार्केट, खेळ मैदाने, उद्याने, सांस्कृतीक वारसा संवर्धन, बाल, महिला, प्रौढ, इ. सर्व स्तरातील नागरिकांसाठी आदर्श व्यवस्थापनांत एकेकाळी समृद्ध बगदाद शहरांपेक्षाही सुनियोजित अशा या ऐतिहासिक अहिल्यानगर शहराला पुन्हा एकदा आदर्श शहर निर्माण करण्यासाठी विविध उपाययोजनांतर्गत आर्किटेक्चर महाविद्यालयाचे मोलाचे व भरीव योगदानाचे महत्त्व महापौर सौ. ज्योतीताई गाडे यांनी विषद केले.

या कार्यक्रमाच्या प्रसंगी संस्थेचे मॅनेजींग ट्रस्टी सीए रमेश फिरोदिया, विश्वस्त सल्लागार डॉ.शरद कोलते, प्राचार्य आर्की. सुहास चौधरी, आर्की. बिपीन बोंडे व सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धनश्री मुथियान, करण पालवे याने केले. वैष्णवी मिसाळ हिने आभार मानले.



के. जी. कला व वाणिज्य महाविद्यालयात माजी विद्यार्थी मेळावा व पालक सभा आयोजित करण्यात आली होती.

# के. जी. कला व वाणिज्य महाविद्यालयात 'माजी विद्यार्थी मेळावा व पालक सभा'

नगर - के. जी. कला व वाणिज्य महाविद्यालयात माजी विद्यार्थी मेळावा व पालक सभेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. त्यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष किशोर मुनोत यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना शिक्षणाला कोणतेही वय नसते, हे अधोरेखित केले तसेच संस्थेची शिक्षणाविषयीची सामाजिक बांधिलकी स्पष्ट केली.

यानंतर महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. स्वाती मुनोत यांनी सन २००७ पासून आजपर्यंतच्या महाविद्यालयाच्या शैक्षणिक प्रवासाचा आढावा सादर केला. त्यांनी महाविद्यालयाची शिक्षणाविषयीची भूमिका, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणारे उपक्रम व भविष्यातील उद्दिष्टे याबाबत मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. आरती खेडकर यांनी केले, तर प्रा. डॉ. वर्षा कीर्तने यांनी परिचय करून दिला. यावेळी माजी विद्यार्थी व आजी-माजी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाविषयी अनुभव व मनोगत व्यक्त केले. प्रा. स्नेहल बोरावके यांनी आभार मानले.

कार्यक्रमास पालक सुषमा वैद्य, कार्यालयीन अधीक्षक संतोष मुनोत, प्रा. डॉ. राहुल थोरात, हर्षाली रासकर, माजी विद्यार्थी, आजी विद्यार्थी तसेच पालक उपस्थित होते.

# ब्राझीलच्या शिष्टमंडळाचा भारत दौरा

## पुणे-स्थित भारतीय सामाजिक संस्था अराउकेरिया डेक्कन इंटरनॅशनल फाउंडेशन सोबत सहकार्याची घोषणा



नगर - पराना राज्य (ब्राझील) येथील एका उच्च-स्तरीय शिष्टमंडळाने, ज्याचे नेतृत्व अराउकेरिया फाउंडेशनचे (पराना राज्य सरकारच्या निधी देणारी संस्था, ब्राझील) अध्यक्ष रामिरो वारहाफ्टिग यांनी केले, आणि ज्यात संचालक सुश्री क्रिस्टियान, डॉ. जॉर्ज एडिसन रिबेरो यांचा समावेश होता, त्यांनी भारतीय सामाजिक संस्था अराउकेरिया डेक्कन इंटरनॅशनल फाउंडेशन सोबत एका महत्त्वपूर्ण सहकार्याची घोषणा करण्यासाठी भारताला भेट दिली. हा कार्यक्रम पुणे येथील कॉनरॅड हॉटेलमध्ये आयोजित करण्यात आला होता. ब्राझीलच्या शिष्टमंडळाचे प्रविण नरवडे (अध्यक्ष - अराउकेरिया डेक्कन इंटरनॅशनल फाउंडेशन), सुधीर खैरे, निलेश होले, दीपक झांजले, आशिष वेदपाठक आणि टीम सदस्यांनी हार्दिक स्वागत केले. कार्यक्रमानंतर श्रीमंत दगडूशेठ गणपती मंदिरात जाऊन दर्शन घेतले व आपली भारतीय संस्कृती जाणून घेतली.

या भागीदारीचा उद्देश भारत आणि ब्राझील दरम्यान कृषी क्षेत्रातील कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), शाश्वत विकास, नवोपक्रम, आरोग्यसेवा आणि सांस्कृतिक देवाणघेवाण यांना प्रोत्साहन देणे आहे.

विज्ञान, तंत्रज्ञान आणि नवोपक्रमातील कार्यासाठी ओळखल्या जाणाऱ्या अराउकेरिया फाउंडेशनने भारतासह विविध देशांसोबत भागीदारी स्थापित केली आहे.

हे सहकार्य कृषी क्षेत्रातील कृत्रिम बुद्धिमत्ता, आरोग्यसेवा आणि कृषी क्षेत्रातील द्विपक्षीय संशोधन सहकार्य यांसारख्या क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करेल, तसेच नवोपक्रम आणि स्टार्टअप संबंधांना चालना देण्याचेही याचे उद्दिष्ट आहे.

या भेटीदरम्यान, शिष्टमंडळाने महाराष्ट्र राज्याबरोबर पराना राज्याची भागीदारी करावयाचे आहे असे प्रतिपादन केले. संयुक्त संशोधन प्रकल्प, शेतीविषयक तंत्रज्ञान, विद्यार्थी आणि सांस्कृतिक देवाणघेवाण यासह संभाव्य सहकार्याच्या क्षेत्रांवर चर्चा केली

या भागीदारीमुळे संशोधन आणि तांत्रिक नवोपक्रमांना प्रोत्साहन देऊन, तसेच सामाजिक गरजांना प्रतिसाद देणाऱ्या ज्ञानाची देवाणघेवाण करून दोन्ही देशांना फायदा होण्याची अपेक्षा आहे. या सहकार्यामुळे भारत आणि ब्राझील यांच्यातील मजबूत संबंध अधिक दृढ झाले आहेत, कारण आपण दोघेही ब्रिक्सचे सदस्य आहोत आणि भारताकडे २०२६ मध्ये ब्रिक्सचे अध्यक्षपद आहे.

संदर्भ : १. अराउकेरिया फाउंडेशन ब्राझील, जगातील नवोपक्रम https://share.google/pvkuYotRQYNqaRxlD., २. (भारतीय कृषी संशोधन परिषदेने (ICAR) कृषी तंत्रज्ञानातील ब्राझील-भारत क्रॉस-इन्क्यूबेशन कार्यक्रमाची दुसरी आवृत्ती (मैत्री २.०) देखील सुरू केली आहे) मराठी मध्ये सुध्दा लिहिले आहे आपल्या वेळेनुसार आपण भेटून पुढचे ठरवूयात.



बजरंग प्रतिष्ठान, शहाजापूर यांच्यातर्फे विविध प्रकारच्या १०० रोपांचे वृक्षारोपण नुकतेच पार पडले.

# बजरंग प्रतिष्ठाणतर्फे वृक्षारोपण

शेवगाव - बजरंग प्रतिष्ठान, शहाजापूर यांच्यातर्फे विविध प्रकारच्या १०० रोपांचे वृक्षारोपण नुकतेच पार पडले त्यामध्ये विविध वृक्षांपासून मिळणारे फायदे लोकांना समजावून सांगितले. शहाजापूर येथे सोमेश्वर मंदिर परिसर या ठिकाणी हे वृक्षारोपण केले गेले. त्यामध्ये औषधी वनस्पती बेल वृक्ष, सिसम, गुलमोहर आदी वृक्ष यांची जोपासना कशी करावी.

याबाबत बजरंग प्रतिष्ठानचे अध्यक्ष गणेश शिंदे यांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमासाठी शहाजापूरचे उपसरपंच मच्छिंद्र डोईफोडे, अशोक डोईफोडे, संभाजी शिंदे, सतीश डोईफोडे यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सहकार्य केले. त्याचबरोबर युवा वर्गाचे सहकार्य लाभले.

# भावी क्रीडापटू घडविण्यासाठी अशा स्पर्धा महत्त्वाच्या

## प्राचार्य डॉ. माधव सरोदे यांचे प्रतिपादन; राज्यस्तरीय सब ज्युनिअर मैदानी स्पर्धेत खेळाडूंचे उत्कृष्ट प्रदर्शन, ८ ते १४ वयोगटातील खेळाडूंचा सहभाग





अहमदनगर जिल्हा अ‍ॅथलेटिक्स असोसिएशनच्या वतीने व एस.एस.जी.एम. कॉलेज, कोपरगाव येथे दिवंगत नेते अजित पवार यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. शेजारील छायाचित्रात संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय सब ज्युनिअर मैदानी स्पर्धा २०२६ मध्ये सहभागी झालेले खेळाडू.

नगर - क्रीडा क्षेत्रात शिस्त, सातत्य व परिश्रम यांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. सब ज्युनिअर वयोगटातील खेळाडू-मध्ये असलेले कौशल्य योग्य मार्गदर्शनाने देशासाठी यश मिळवून देऊ शकते. एस.एस.जी.एम. कॉलेजने अशा राज्यस्तरीय स्पर्धेचे यशस्वी आयोजन करून क्रीडा क्षेत्रात आपला ठसा उमटविला असल्याचेही उद्घाटनप्रसंगी प्राचार्य डॉ. माधव सरोदे यांनी नमूद केले.

अहमदनगर जिल्हा अ‍ॅथलेटिक्स असोसिएशनच्या वतीने व एस.एस.जी.एम. कॉलेज, कोपरगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय सब ज्युनिअर मैदानी स्पर्धा २०२६ कोपरगाव येथे उत्साहात पार पडल्या. कोपरगाव येथील एस.एस.जी.एम. कॉलेजच्या मैदानावर या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. राज्याच्या विविध जिल्ह्यांतून आलेल्या लहानग्या खेळाडूंनी आपल्या कौशल्याचे दर्शन घडवत स्पर्धेत रंगत आणली.

या स्पर्धांचे उद्घाटन राज्यस्तरीय सब ज्युनिअर मैदानी स्पर्धा समितीचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. माधव सरोदे यांच्या हस्ते झाले. उद्घाटनप्रसंगी महाराष्ट्र राज्य अ‍ॅथलेटिक्स असोसिएशनचे सचिव सतीश उचिल, अहमदनगर जिल्हा अ‍ॅथलेटिक्स असोसिएशनचे अध्यक्ष व शिवछत्रपती पुरस्कारार्थी प्रा. सुनिल जाधव, ज्येष्ठ क्रीडा संघटक व क्रीडा पुरस्कारार्थी अ‍ॅड. भगीरथ निवृत्ती शिंदे, कार्याध्यक्ष रंगनाथ डागवाले, शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त अरूण यशवंत चंद्रे, आयोजन समितीचे सचिव सुनील सिदगीर गोसावी, राज्य स्पर्धेचे तांत्रिक अधिकारी राकेश सावे, चंद्रकांत पाटील, जिल्हा संघटनेचे सचिव दिनेश भालेराव यांच्यासह खेळाडू, प्रशिक्षक व पालक उपस्थित होते.

प्रास्ताविकात दिनेश भालेराव यांनी स्पर्धेच्या आयोजनामागील भूमिका स्पष्ट करताना सांगितले की, लहान वयोगटातच मुला-मुलींना योग्य संधी व व्यासपीठ मिळाल्यास त्यांच्यातील क्रीडा गुणांना दिशा मिळते. जिल्हा व राज्य पातळीवरील अशा स्पर्धांमधूनच भविष्यातील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू घडत असल्याचे ते म्हणाले.

उद्घाटनप्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ. माधव सरोदे म्हणाले की, क्रीडा क्षेत्रात शिस्त, सातत्य व परिश्रम यांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. सब ज्युनिअर वयोगटातील खेळाडूंमध्ये असलेले कौशल्य योग्य मार्गदर्शनाने देशासाठी यश मिळवून देऊ शकते. एस.एस. जी.एम. कॉलेजने अशा राज्यस्तरीय स्पर्धेचे यशस्वी आयोजन करून क्रीडा क्षेत्रात आपला ठसा उमटविला असल्याचेही त्यांनी नमूद केले.

ही स्पर्धा ८, १०, १२ व १४ वर्ष वयोगटातील मुला-मुलींमध्ये घेण्यात आली. धावणे, उड्या, फेक प्रकार आदी विविध मैदानी क्रीडा प्रकारांमध्ये खेळाडूंनी सहभाग नोंदविला. सकाळपासूनच स्पर्धांना सुरुवात झाल्याने संपूर्ण मैदान खेळाडू, प्रशिक्षक व प्रेक्षकांनी गजबजून गेले होते. सूत्रसंचालन राजेंद्र कोहकडे यांनी केले. यशस्वी आयोजनाबद्दल उपस्थितांनी आयोजन समितीचे व एस.एस.जी.एम. कॉलेजचे कौतुक केले. या स्पर्धेमुळे ग्रामीण व शहरी भागातील उदयोन्मुख खेळाडूंना राज्यस्तरावर आपली गुणवत्ता सिद्ध करण्याची संधी मिळाल्याची भावना उपस्थित पालक व क्रीडाप्रेमींनी व्यक्त केली.



शालेय राज्यस्तरीय पावर लिफ्टिंग स्पर्धेत पेमराज सारडा कनिष्ठ महाविद्यालयचे खेळाडू श्रीकृष्ण सूर्यवंशी व सोहम गड्डम यांचा हिंदसेवा मंडळाचे उपाध्यक्ष मधुसूदन मुळे यांच्या हस्ते करण्यात आला.

# पावरलिफ्टिंग स्पर्धेत खेळाडूंची अभिमानास्पद कामगिरी

## डॉ. पारस कोठारी यांचे प्रतिपादन; राज्यस्तरीय पावर लिफ्टिंग स्पर्धेत सारडा महाविद्यालयाचे खेळाडूंचे घवघवीत यश

नगर - पेमराज सारडा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी विविध खेळांमध्ये यश संपादन केले. सातारा येथे नुकत्याच झालेल्या राज्यस्तरीय पावर लिफ्टिंग स्पर्धेत श्रीकृष्ण सूर्यवंशी व सोहम गड्डम या खेळाडुंनी उत्कृष्ट यश मिळविल्याने सारडा महाविद्यालयाच्या नावलौकिकात भर पडली आहे. पावर लिफ्टिंग स्पर्धेत खेळाडूंनी केलेली कामगिरी ही महाविद्यालयासाठी अभिमानास्पद बाब आहे. खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी हिंद सेवा मंडळाचे सर्व संचालक व पदाधिकारी कायम तत्पर असतात, असे प्रतिपादन सारडा महाविद्यालयाचे जुनिअर कॉलेजचे चेअरमन डॉ.पारस कोठारी यांनी केले आहे.

विजयी विद्यार्थ्यांचा सत्कार हिंदसेवा मंडळाचे उपाध्यक्ष मधुसूदन मुळे यांच्या हस्ते करण्यात आला. शालेय राज्यस्तरीय पावर लिफ्टिंग स्पर्धेत पेमराज सारडा कनिष्ठ महाविद्यालय चा श्रीकृष्ण सूर्यवंशी १२ वी सायन्स चा विद्यार्थी याने १९ वयोगटात पावर लिफ्टिंग शालेय राज्य स्पर्धेत १०५ किलो गटामध्ये ३९५ कि.ग्र. वजन उचलून राज्यस्तरीय स्पर्धेत प्रथम क्रमांक (गोल्ड मेडल) पटकावलं आहे. हरियाणा येथे होणाऱ्या शालेय राष्ट्रीय पावरलिफ्टिंग स्पर्धेसाठी त्याची निवड झाली आहे. तसेच १९ वर्ष वयोगटात सोहम गड्डम (१२ वी कॉमर्स) याने ९३ किलो वजन गटात ५०० कि.ग्र.वजन उचलून सिल्व्हर मेडल मिळविल्याबद्दल सारडा महाविद्यालयाच्या वतीने दोन्ही खेळाडूंचा सत्कार करण्यात आला.

यावेळी हिंदसेवा मंडळाचे मानद सचिव संजय जोशी, ज्येष्ठ मार्गदर्शक मधुसुदन मुळे, अ‍ॅड.अनंत फडणीस, अजित बोरा, जुनिअर कॉलेजचे चेअरमन डॉ. पारस कोठारी, अनंत देसाई, उपप्राचार्य गिरीश पाखरे, प्रबंधक अशोक असेरी, प्रा.अक्षय कर्डिले, प्रा.संदेश पिपाडा, सहाय्यक सचिव योगेश देशमुख, गोवर्धन पांडुळे, गोरडे सर आदी उपस्थित होते.

हिंदसेवा मंडळाच्या पदाधिकारी यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले. व पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. खेळाडूंना क्रीडा शिक्षक प्रा.संजय साठे यांचे मार्गदर्शन लाभले.

# यु.जी.सी. नेट परीक्षेत प्रा. अर्शद शेख उत्तीर्ण



श्रीरामपूर - येथील डाकले महाविद्यालयातील प्रा. अर्शद शेख (सहाय्यक प्राध्यापक, वाणिज्य विभाग) यांनी नुकतीच वाणिज्य विषयातील यु.जी. सी. नेट परीक्षा उत्तीर्ण केली.

त्यांच्या या यशाबद्दल महाविद्यालय विकास समितीच्या चेअरमन व रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या मीनाताई जगधने, रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य, सुजित जगधने सर्व महाविद्यालय विकास समिती सदस्य, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.संजय कांबळे, उपप्राचार्य प्रो. (डॉ.) सादिक सय्यद, प्रा. सुभाष देशमुख, अधिक्षक सोमनाथ पथवे, पर्यवेक्षक विजय दळवी, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ.अनिकेत खत्री, प्रा. योगीराज चंद्रात्रे, डॉ. संतोष घंगाळे, त्यांच्या आई श्रीमती मिनाज शेख बंधू अल्तमश शेख यांनी अभिनंदन केले.

प्रा. अर्शद शेख यांनी विद्यार्थ्यांच्या कौशल्य वृद्धीसाठी प्रधानमंत्री कौशल विकास योजना ४.० अंतर्गत विविध कौशल्याधारित कोर्सेसचे समन्वयक म्हणून यशस्वीपणे कामकाज पाहत असून अकौंटन्सी विषयाचे 'विद्यार्थीप्रिय' शिक्षक आहेत.

# अहिल्यानगरमधून वृद्ध व्यक्ती बेपत्ता



अशोक मुत्याल

नगर - शहरातील चितळेरोडवरील नेहरू मार्केट मागील भराड गल्ली येथून ७५ वर्षीय वृद्ध व्यक्ती बेपत्ता झाले आहेत. अशोक जनार्दन मुत्याल असे या बेपत्ता झालेल्या व्यक्तीचे नाव आहे.

मुत्याल हे २६ जानेवारी रोजी सायंकाळी घरातून बेपत्ता झाले आहेत. त्यांच्या बाबत कोणाला काही माहिती मिळाल्यास मोबाईल क्र. ९०२२६२९८०३ किंवा ८००७८१९७४९ या वर संपर्क साधावा असे आवाहन त्यांच्या कुटुंबीयांनी केले आहे.

# अर्थजगत

# ‘कॉन्ट्रॅक्ट नोट’ नीट पडताळताय ना?


शेअर बाजारामध्ये जेव्हा एखादा गुंतवणूकदार किंवा व्यापारी शेअर्सची खरेदी अथवा विक्री करतो, तेव्हा त्या व्यवहाराची अधिकृत नोंद असणे अत्यंत आवश्यक असते. भारतीय शेअर बाजार नियामक मंडळाच्या (सेबी) नियमांनुसार, प्रत्येक स्टॉक ब्रोकरने आपल्या ग्राहकाला त्याने केलेल्या व्यवहाराचा तपशील एका विशेष दस्तऐवजाद्वारे देणे बंधनकारक असते, ज्याला ‘कॉन्ट्रॅक्ट नोट’ असे संबोधले जाते.

हा दस्तऐवज म्हणजे गुंतवणूकदार आणि ब्रोकर यांच्यातील व्यवहाराचा कायदेशीर पुरावा असतो. जेव्हा आपण झिरोधा, ग्रो, एंजल वन, धन यांसारख्या कोणत्याही प्लॅटफॉर्मवरून शेअर्स घेतो, तेव्हा त्या दिवसाचे बाजाराचे कामकाज बंद झाल्यानंतर साधारणतः २४ तासांच्या आत हा दस्तऐवज आपल्या ईमेलवर पाठवला जातो. या दस्तऐवजाचे महत्त्व भविष्यातील कर आकारणी आणि कायदेशीर वादांमध्ये स्वतःची बाजू मांडण्यासाठी देखील असते.

कॉन्ट्रॅक्ट नोटमध्ये प्रामुख्याने ज्या कंपनीचे शेअर्स तुम्ही खरेदी केले आहेत त्याचे नाव, व्यवहाराची तारीख आणि नेमकी वेळ नमूद केलेली असते. त्यासोबतच व्यवहाराचा प्रकार म्हणजे खरेदी आहे की विक्री, हे स्पष्ट केलेले असते.

व्यवहाराची एकूण संख्या आणि ज्या किमतीला शेअर्स घेतले किंवा विकले आहेत ती किंमत तिथे दिलेली असते. महत्त्वाचे म्हणजे, केवळ शेअर्सची किंमतच नव्हे, तर त्या व्यवहारावर ब्रोकरने लावलेले शुल्क म्हणजे ‘ब्रोकरेज’ आणि सरकारने आकारलेले विविध कर यांचा स्वतंत्र उल्लेख असतो.

यामध्ये ‘सिक्युरिटीज ट्रान्झॅक्शन टॅक्स’ (एसटीटी), ‘एक्सचेंज ट्रान्झॅक्शन चार्जेस’, ‘जीएसटी’, ‘सेबी टर्नओव्हर फी’ आणि ‘स्टॅम्प ड्युटी’ यांसारख्या विविध शुल्कांचा समावेश असतो. या सर्व घटकांची बेरीज करून शेवटी तुमच्या खात्यातून किती रक्कम वजा झाली आहे किंवा तुम्हाला किती रक्कम मिळणार आहे, याचा अंतिम हिशोब दिलेला असतो.




**गुंतवणूकदार आणि व्यापाऱ्यांसाठी या दस्तऐवजाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.**

सर्वात पहिले म्हणजे, हा दस्तऐवज व्यवहाराची पारदर्शकता सुनिश्चित करतो. अनेकदा आपल्याला वाटते की आपण एका विशिष्ट किमतीला शेअर घेतला आहे, परंतु प्रत्यक्षात झालेला व्यवहार आणि त्यावर लागलेले छुपे शुल्क समजून घेण्यासाठी कॉन्ट्रॅक्ट नोट तपासणे आवश्यक ठरते. प्राप्तिकर भरताना, विशेषतः ‘कॅपिटल गेन्स टॅक्स’ किंवा भांडवली नफ्यावरील कराची गणना करण्यासाठी हा सर्वात महत्त्वाचा आधार असतो. जर कधी ब्रोकर आणि तुमच्यामध्ये व्यवहारावरून काही मतभेद निर्माण झाले, तर लवाद किंवा न्यायालयासमोर हाच दस्तऐवज पुरावा म्हणून ग्राह्य धरला जातो.

**माहीत आहे?**

त्यामुळे प्रत्येक व्यवहाराची डिजिटल प्रत जपून ठेवणे हा शिस्तबद्ध गुंतवणुकीचा एक भाग आहे.

कॉन्ट्रॅक्ट नोट मिळाल्यावर सर्वात आधी आपला ‘क्लायंट कोड’ आणि पॅन क्रमांक बरोबर असल्याची खात्री करावी. ज्या भावात आपण ऑर्डर दिली होती आणि ज्या भावात ती पूर्ण झाली आहे, त्यात मोठी तफावत नाही ना, हे पाहावे. काही वेळा ‘ऑर्डर एक्झिक्युशन’ दरम्यान किमतीत बदल होऊ शकतो, त्यामुळे त्याची पडताळणी करणे हिताचे ठरते. तसेच, ठरलेल्या दराप्रमाणेच ब्रोकरेज आकारले आहे का, हे पाहणे देखील तितकेच गरजेचे आहे. कर रचनेमध्ये ‘एसटीटी’ सारखे कर योग्य प्रकारे लावले आहेत की नाही, याची नोंद घ्यावी. जर तुम्हाला एखाद्या व्यवहाराबद्दल शंका वाटली, तर २४ तासांच्या आत ब्रोकरकडे त्याबद्दल तक्रार नोंदवता येते.

कॉन्ट्रॅक्ट नोट हा केवळ एक तांत्रिक कागद नसून तो तुमच्या कष्टाच्या पैशांच्या सुरक्षिततेचे कवच आहे. डिजिटल युगात हे सर्व दस्तऐवज ईमेलवर उपलब्ध असले, तरी त्यांची स्वतंत्र फाईल बनवून ठेवणे केव्हाही चांगले. यामुळे तुमच्या एकूण गुंतवणुकीचा मागोवा घेणे सोपे जाते आणि वर्षाच्या शेवटी जेव्हा सीए किंवा टॅक्स सल्लागाराकडे माहिती द्यायची असते, तेव्हा गोंधळ उडत नाही.

शेअर बाजारात शिस्त केवळ खरेदी-विक्रीतच नव्हे, तर अशा प्रशासकीय बाबींमध्येही पाळणे दीर्घकालीन यशासाठी अत्यंत आवश्यक आहे.



**आ**भारत सरकारने १० वर्षांनंतर बॅगेज नियमांमध्ये मोठे बदल केले असून, नवीन ‘बॅगेज नियम २०२६’ आता २ फेब्रुवारी २०२६ पासून लागू झाले आहेत. या नवीन नियमांमुळे आंतरराष्ट्रीय प्रवाशांना, विशेषतः अनिवासी भारतीयांना आणि पर्यटकांना मोठी सवलत मिळाली आहे. नव्या नियमावलीत सरकारने सोन्याच्या दागिन्यांसाठी असलेली किमतीची मर्यादा (प्राईस कॅप) पूर्णपणे काढून टाकली आहे. आता दागिन्यांची सवलत केवळ त्यांच्या वजनावर आधारित असेल.

## नव्या ‘बॅगेज नियमांच्या’ अंतरंगात...

**महिला प्रवाशांसाठी:** ४० ग्रॅमपर्यंत सोन्याचे दागिने विनाशुल्क (ड्युटी फ्री) आणता येतील.

**पुरुष प्रवाशांसाठी:** २० ग्रॅमपर्यंत सोन्याचे दागिने विनाशुल्क आणता येतील.

ही सवलत केवळ अशा भारतीय नागरिकांना किंवा भारतीय वंशाच्या पर्यटकांना मिळेल, जे १ वर्षापेक्षा जास्त काळ परदेशात वास्तव्य करून परतत आहेत. पूर्वी महिला प्रवाशांना १ लाख रुपये आणि पुरुषांना ५०,००० रुपयांपर्यंतचेच दागिने आणण्याची मुभा होती. सोन्याच्या वाढत्या किमतींमुळे या मर्यादेत फारच कमी सोने आणता येत होते, मात्र आता केवळ वजनाचा निकष लावल्यामुळे प्रवाशांना मोठा फायदा होईल.

**७५,००० रुपयांपर्यंतचे सामान आता करमुक्त :** प्रवाशांच्या वैयक्तिक खरेदीसाठी असलेल्या मर्यादेतही मोठी वाढ करण्यात आली आहे.

**जाणून घ्या**

**१. भारतीय नागरिक आणि भारतीय वंशाचे पर्यटक:** हवाई किंवा सागरी मार्गाने भारतात येणारे प्रवासी आता ७५,००० रुपयांपर्यंतचे सामान विनाशुल्क आणू शकतात. पूर्वी ही मर्यादा ५०,००० रुपये होती.

**२. परदेशी पर्यटक:** परदेशातून येणाऱ्या पर्यटकांना आता २५,००० रुपयांपर्यंतचे सामान विनाशुल्क आणता येईल. पूर्वी ही मर्यादा १५,००० रुपये होती.

**३. निवास हस्तांतरण (ट्रान्सफर ऑफ रेसिडेन्स):** जे भारतीय कायमचे मायदेशी परतत आहेत, त्यांच्यासाठी सवलतीची मर्यादा वाढवून ती वास्तव्याच्या कालावधीनुसार १.५ लाख ते ७.५ लाख रुपयांपर्यंत करण्यात आली आहे.

**इलेक्ट्रॉनिक्स आणि लॅपटॉपसाठी दिलासा :** तंत्रज्ञान वापरणाऱ्या प्रवाशांसाठीही सरकारने सवलत दिली आहे. १८ वर्षांवरील कोणताही प्रवासी (विमान कर्मचारी सोडून) स्वतःच्या वापरासाठी १ नवीन लॅपटॉप किंवा नोटपॅड विनाशुल्क आणू शकतो. याशिवाय, वैयक्तिक वापरासाठी आणल्या जाणाऱ्या वस्तूंवरील मूलभूत सीमाशुल्क २० टक्क्यांवरून कमी करून १० टक्के करण्याचा प्रस्तावही मांडण्यात आला आहे. यामुळे परदेशातून स्मार्टफोन किंवा इतर गॅजेट्स आणणे स्वस्त होईल.

**महत्त्वाचे नियम आणि अटी मर्यादा विभागता येत नाही:** कुटुंबातील दोन सदस्य आपली ७५,००० रुपयांची मर्यादा एकत्र करून एखादी दीड लाख रुपयांची वस्तू आणू शकत नाहीत. प्रत्येक व्यक्तीची मर्यादा स्वतंत्र असेल.

**काय आणता येणार नाही? :** ही सवलत मद्य (२ लिटरपेक्षा जास्त), सिगारेट (१०० पेक्षा जास्त), बंदुका, सोने किंवा चांदीच्या विटा/नाणी आणि टेलिव्हिजन या वस्तूंसाठी लागू नाही.

**डिजिटल घोषणा :** प्रवासी आता ‘अतिथी’ ॲप किंवा ऑनलाईन पोर्टलद्वारे आपल्या सामानाची घोषणा आगाऊ करू शकतात, ज्यामुळे विमानतळावर रांगेत उभे राहण्याची गरज उरणार नाही. हे नवीन नियम जागतिक प्रवासाच्या बदलत्या पद्धती आणि वाढत्या महागाईचा विचार करून लागू करण्यात आले आहेत, ज्यामुळे प्रवाशांचा प्रवास अधिक सुखकर होईल.




## मौल्यवान धातूंच्या दरात ‘महाप्रलय’ कशामुळे?

**गे**ल्या काही दिवसांमध्ये जागतिक बाजारपेठेत चांदीच्या किमतींनी आजवरचा सर्वात भीषण तडाखा अनुभवला आहे. ऐतिहासिक स्वरुपाच्या घसरणीमुळे गुंतवणूकदारांचे धाबे दणाणले आहेत. चिनी बाजारपेठेतून सुरू झालेली ही विक्रीची लाट आशियाई सत्रात १७ टक्क्यांपर्यंत पोहोचली आणि पाहता पाहता जागतिक स्तरावर चांदीच्या दरात मोठी पडझड झाली. या महाप्रलयामागे जागतिक अर्थकारणातील अनेक गुंतागुंतीचे धागेदोरे कारणीभूत आहेत.

१ चिनी बाजारपेठेतील विक्रीचा सपाटा हे याचे मुख्य कारण आहे. चीनमधील सट्टेबाजांनी मोठ्या प्रमाणात नफावसुली सुरू केल्याने या घसरणीला सुरुवात झाली. गेल्या वर्षभरात चांदीच्या दरात जी अफाट वाढ झाली होती, त्यामागे चीनमधील सट्टेबाजीचा मोठा वाटा होता. भू-राजकीय तणाव आणि अमेरिकन मध्यवर्ती बँकेच्या स्वायत्ततेबाबतच्या चर्चेमुळे दरात कृत्रिम तेजी निर्माण झाली होती, ती आता वेगाने ओसरत आहे.

२ जागतिक बाजारपेठेत डॉलर मजबूत झाल्याचा थेट फटका मौल्यवान धातूंना बसला. डॉलर वधारल्यामुळे गुंतवणूकदारांनी त्यांचे सोन्या-चांदीतील तेजीचे व्यवहार गुंडाळण्यास सुरुवात केली, ज्यामुळे बाजारावरचा ताण वाढत गेला.

३ बाजारात खरेदी-विक्रीसाठी आवश्यक असलेल्या रोख रकमेची किंवा तरलतेची कमतरता निर्माण झाली आहे. कमी व्यवहार आणि अधिक चढ-उतार यामुळे एक दुष्टचक्र तयार झाले असून, घसरणीचा वेग अधिकच तीव्र झाला आहे.

४ चांदीच्या घसरणीचा संसर्ग सोन्यालाही झाला आहे. २०१३ नंतरची सर्वात मोठी एकदिवसीय घसरण सोन्याने अनुभवली. स्पॉट गोल्डमध्ये साडेतीन टक्क्यांहून अधिक घट झाल्याने संपूर्ण धातू बाजार हादरला आहे.

५ केवळ मौल्यवान धातूच नव्हे, तर तांब्यासारख्या औद्योगिक धातूंवरही याचे सावट आहे. कॉपर दीड टक्क्यांनी घसरून १३,००० डॉलर प्रति टनाच्या खाली आले आहे, जे जागतिक मंदीचे संकेत मानले जात आहेत.


६ जानेवारी महिन्यात गुंतवणूकदारांनी चांदीमध्ये मोठ्या प्रमाणात कॉल ऑप्शन्स आणि लेव्हरेज्ड उत्पादनांमध्ये गुंतवणूक केली होती. भाव पडू लागताच या सर्व पोझिशन्स एकामागून एक निकालात निघू लागल्या. यामुळे विक्रीचा डोंगर उभा राहिला.

७ सोन्याच्या तुलनेत चांदीची जागतिक बाजारपेठ लहान आहे. त्यामुळे थोडी जरी मोठी हालचाल झाली, तरी त्याचे परिणाम अत्यंत टोकाचे असतात. याच कारणामुळे चांदीमधील अस्थिरता नेहमीच जास्त असते.

८ लंडनमधील ओटीसी बाजारपेठेत काम करणाऱ्या बँकांसाठी सध्याचे व्यवहार सांभाळणे अत्यंत जोखमीचे झाले आहे. वाढलेल्या किमती आणि कमी क्रेडिट मर्यादेमुळे मोठे सौदे करणे कठीण झाले असून, त्याचा परिणाम किमतींवर होत आहे.

९ अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केविन वॉर्श यांची फेडरल रिझर्व्हच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्याच्या हालचाली सुरू केल्याचा परिणामही या दरांवर दिसून आला आहे. व्याजदरात कपात करण्याबाबतच्या अनिश्चिततेमुळे गुंतवणूकदार सावध पावले टाकत आहेत.

१० चांदी आता ७० डॉलर या मानसशास्त्रीय पातळीवर उभी आहे. जर किमती ७१ डॉलरच्या खाली स्थिरावल्या, तर ही घसरण ६० डॉलरच्या दिशेने जाऊ शकते, अशी भीती विश्लेषकांनी व्यक्त केली आहे.




## अर्थसंकल्पानंतर कोणती करप्रणाली निवडावी?

**अ**र्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आपल्या सलग नवव्या अर्थसंकल्पात आयकर रचनेत कोणतेही मोठे बदल केलेले नाहीत. यामुळे कर रचनेत स्थिरता असली, तरी करदात्यांसमोर बचतीसाठी नेमका कोणता मार्ग निवडावा, असा प्रश्न कायम आहे. २०२० मध्ये सुरू झालेली नवी कर प्रणाली आता जुन्या प्रणालीसोबतच उपलब्ध असेल. नव्या कर प्रणालीत कराचे दर कमी असले तरी सवलती मर्यादित आहेत, तर जुन्या प्रणालीत कराचे दर जास्त असूनही विविध गुंतवणुकींवर मोठ्या प्रमाणात वजावट घेता येते.

### ■ नव्या कर प्रणालीचे स्वरूप:

नव्या कर रचनेत ४ लाख रुपयांपर्यंतचे उत्पन्न पूर्णपणे करमुक्त ठेवण्यात आले आहे. त्यानंतरच्या उत्पन्नावर ५ टक्क्यांपासून ३० टक्क्यांपर्यंत टप्प्याटप्प्याने कर आकारला जातो. विशेष म्हणजे, ज्यांचे वार्षिक उत्पन्न १२ लाख रुपयांपर्यंत आहे, त्यांना पूर्ण कर सवलत (रिबेट) मिळत असल्याने त्यांचा प्रभावी कर शून्य होतो. पगारदार वर्गासाठी ७५,००० रुपयांच्या प्रमाणित वजावटीमुळे (स्टँडर्ड डिडक्शन) हे मर्यादित उत्पन्न १२.७५ लाख रुपयांपर्यंत करमुक्त होऊ शकते.

### ■ जुन्या कर प्रणालीचे फायदे आणि मर्यादा

ज्या करदात्यांकडे मोठ्या प्रमाणात गुंतवणूक आणि वजावटीचे पर्याय आहेत, त्यांच्यासाठी जुनी कर रचना अजूनही महत्त्वाची ठरते. या प्रणालीत २.५ लाख रुपयांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त असते. या प्रणालीत मिळणाऱ्या सवलती: घरभाडे भत्ता, रजा प्रवास भत्ता, कलम ८० सी अंतर्गत दीड लाखांपर्यंतची गुंतवणूक, कलम ८० डी नुसार वैद्यकीय विमा, एनपीएस मधील गुंतवणूक आणि गृहकर्जाचे व्याज यांसारख्या अनेक महत्त्वाच्या वजावटींचा लाभ यात घेता येतो.

### ■ योग्य निवड कशी करावी?

कर तज्ज्ञांच्या मते, १२ लाख रुपयांपर्यंत उत्पन्न असणाऱ्यांसाठी नवी कर प्रणाली अधिक फायदेशीर आणि सुटसुटीत आहे. मात्र, ज्यांचे उत्पन्न २४ लाख रुपयांपेक्षा जास्त आहे, त्यांच्यासाठी गणिते बदलतात. जर एखादा करदाता विविध कलमांखाली ८ लाख रुपयांहून अधिक रकमेची वजावट सिद्ध करू शकत असेल, तरच त्याला जुन्या प्रणालीत अधिक फायदा मिळू शकतो.

### ■ प्रशासकीय बदल आणि सुधारणा

अर्थसंकल्पात कर रचनेत बदल नसले तरी प्रक्रिया अधिक सुलभ करण्यावर भर देण्यात आला आहे. सुधारित आयटीआर फाईल करण्याची मुदत ३१ डिसेंबरवरून वाढवून ३१ मार्च करण्यात आली आहे. तसेच, मोटार अपघात दावा लवादाकडून मिळणाऱ्या व्याजाला पूर्णपणे करमुक्त करण्यात आले आहे. नवा आयकर कायदा २०२५ हा १ एप्रिल २०२६ पासून लागू होणार असून, भविष्यात अधिक सोपे अर्ज उपलब्ध करून देण्याचे सूतोवाच करण्यात आले आहे.




## पीएफसंबंधी नवे करनियम का फायद्याचे?

**कें**द्रीय अर्थसंकल्प २०२६-२७ मध्ये कर्मचारी भविष्य निर्वाह निधीशी म्हणजेच पीएफ संबंधित कराच्या नियमांचे सुलभीकरण करण्यात आले असून ईपीएफओने या बदलांचे स्वागत केले आहे. नवीन प्रस्तावांमुळे कर्मचारी आणि कंपन्या या दोघांनाही कराच्या गुंतागुंतीतून दिलासा मिळणार असून, नियमांमधील स्पष्टतेमुळे गुंतवणुकीवर सकारात्मक परिणाम होणार आहे.

### १. नियमांमधील विसंगती दूर :

यापूर्वी ‘इन्कम टॅक्स’ (प्राप्तिकर) कायदा आणि ‘कर्मचारी भविष्य निर्वाह निधी अधिनियम, १९५२’ यामध्ये तांत्रिक तफावत होती. विशेषतः खासगी ‘पीएफ ट्रस्ट’साठी कर सवलतीचे निकष आणि गुंतवणुकीच्या पद्धती वेगवेगळ्या होत्या. आता प्राप्तिकर कायदा, २०२५ च्या ‘शेड्युल ११’ नुसार, ज्या कंपन्यांनी भविष्य निर्वाह निधी कायद्याच्या ‘कलम १७’ अंतर्गत कायदेशीर सवलत मिळवली आहे, त्यांनाच करात सवलत मिळेल. यामुळे दोन समांतर व्यवस्थांऐवजी आता एकच सुटसुटीत नियम लागू होईल.

### २. गुंतवणुकीत अधिक लवचिकता :

जुन्या नियमांनुसार, ‘पी.एफ.’ मधील ५० टक्के रक्कम सरकारी रोख्यांमध्ये (सिक्युरिटीज) गुंतवणे बंधनकारक होते. आता अर्थसंकल्पात ही मर्यादा हटवण्यात आली आहे. यापुढे गुंतवणुकीचे सर्व निर्णय ‘ईपीएफओ’च्या आराखड्यानुसार घेतले जातील. यामुळे ‘पी.एफ. फंड’ व्यवस्थापकांना बाजारातील संधींचा लाभ घेऊन गुंतवणुकीवर अधिक चांगला परतावा मिळवण्यासाठी वाव मिळेल.

### ३. मालकाच्या योगदानावर ७.५ लाखांची मर्यादा :

नव्या नियमानुसार, कंपनी मालकाने (एम्प्लॉयर) कर्मचाऱ्याच्या पीएफ खात्यात केलेले वार्षिक ७.५ लाख रुपयांपर्यंतचे योगदान आता करमुक्त असेल. हे योगदान ७.५ लाख रुपयांच्या मर्यादेपेक्षा जास्त असेल, तर त्या अतिरिक्त रकमेवर कर आकारला जाईल आणि ती रक्कम कर्मचाऱ्याची जास्तीची सवलत (परक्विजिट) मानली जाईल. यापूर्वीची टक्केवारीवर आधारित क्लिष्ट मर्यादा आता पूर्णपणे काढून टाकण्यात आली आहे.

### ४. सेवानिवृत्तीनंतरची सुरक्षा अधिक मजबूत :

या बदलांमुळे कंपन्यांवरील प्रशासकीय बोजा कमी होईल आणि कर्मचाऱ्यांना त्यांच्या बचतीचे हिशोब समजणे सोपे जाईल. नियमांमधील या एकसारखेपणामुळे कायदेशीर वाद कमी होतील आणि ‘रिटायरमेंट’साठी केली जाणारी ही महत्त्वाची गुंतवणूक अधिक सुरक्षित होईल.

## परदेशी शिक्षणासंदर्भात बदललेल्या तरतुदी

**कें**द्रीय अर्थसंकल्प २०२६ मध्ये सरकारने विशेषतः परदेशात उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या गरजा लक्षात घेऊन काही महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. यामध्ये ‘टीसीएस’ (टॅक्स कलेक्टेड ॲट सोर्स) दरातील कपात आणि ‘कस्टम ड्युटी’मधील घट या दोन प्रमुख बाबींचा समावेश आहे. या बदलांमुळे मध्यमवर्गीय कुटुंबांवरील आर्थिक ताण कमी होऊन परदेशातील शिक्षणाचे नियोजन अधिक सुलभ होणार आहे.

या अर्थसंकल्पातील सर्वात मोठा आणि स्वागतार्ह बदल म्हणजे ‘लिबरलाईज्ड रेमिटन्स स्कीम’ (एलआरएस) अंतर्गत परदेशात शिक्षणासाठी आणि वैद्यकीय उपचारांसाठी पाठवल्या जाणाऱ्या रकमेवरील टीसीएस ५ टक्क्यांवरून २ टक्के करण्यात आला आहे. ही सवलत १० लाख रुपयांपेक्षा जास्त रकमेवर लागू होईल. हा कर जरी नंतर परताव्याच्या स्वरूपात परत मिळत असला, तरी व्यवहाराच्या वेळी मोठी रक्कम अडकून पडत असे. आता दर कमी झाल्यामुळे कुटुंबांकडे अधिक रोख रक्कम शिल्लक राहील, ज्याचा वापर ते इतर शैक्षणिक खर्चासाठी करू शकतील. यामुळे शैक्षणिक कर्जाची गरज आणि त्यावरील मासिक हप्त्यांचा बोजाही कमी होण्यास मदत होईल.

विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षणासाठी जाताना लॅपटॉप, टॅब्लेट आणि इतर शैक्षणिक इलेक्ट्रॉनिक उपकरणांची आवश्यकता असते. यापूर्वी अशा उपकरणांवर साधारणपणे २० टक्के कस्टम ड्युटी’ आकारली जात होती. सरकारने ही ड्युटी आता १० टक्क्यांपर्यंत खाली आणली आहे. उदाहरण द्यायचे झाल्यास, जर एखादा विद्यार्थी १ लाख रुपयांचे शैक्षणिक साहित्य खरेदी करत असेल, तर त्याला आता पूर्वीच्या २०,००० रुपयांऐवजी केवळ १०,००० रुपये शुल्क द्यावे लागेल. ही थेट बचत पालकांच्या खिशाला मोठा आधार देणारी ठरेल.



**नवे नियम**

कायदेशीर गुंतागुंतीतून सुटका परदेशात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सरकारने ‘फॉरेन एसेट्स ऑफ स्मॉल टॅक्सपेअर्स – डिस्क्लोजर स्कीम’ही नवी योजना जाहीर केली आहे. अनेकदा विद्यार्थी परदेशात असताना तिथे बँक खाते उघडतात, त्यांना शिष्यवृत्ती मिळते किंवा लहान स्वरूपात बचत करतात. अनावधानाने या विदेशी मालमत्तांची माहिती प्राप्तिकर विवरणपत्रात (आय.टी.आर.) दिली जात नाही, ज्यामुळे भविष्यात कायदेशीर अडचणी निर्माण होऊ शकतात. या योजनेमुळे विद्यार्थ्यांना कोणतीही कठोर दंडात्मक कारवाई न सोसता आपल्या विदेशी संपत्तीचा खुलासा करण्याची एक संधी मिळणार आहे. यामुळे त्यांचे आर्थिक रेकॉर्ड स्वच्छ राहतील आणि भविष्यात व्हिसा किंवा पुढील कर्जासाठी कोणतीही अडचण येणार नाही.

